म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
२०७१२२३

# सुभाषित-पारिजात.



अ. ग. [illegible]शी विरचित.

REFBK-0002364

मराठी

# सुभाषित-पारिजात

भाग पहिला.

कर्ता,

लक्ष्मण नारायण जोशी.

मिळण्याचें ठिकाण:—

लक्ष्मण नारायण गोडबोले,

बुकसेलर, बुधवार पेठ, पुणें.

प्रथमावृत्ति.] किंमत १२ आणे. [सन १९२३.

प्रकाशकः—लक्ष्मण नारायण जोशी,
५४ शुक्रवार, पुणें शहर.

मुद्रकः—अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

# प्रस्तावना.

न विद्यते यद्यपि पूर्ववासना
गुणानुबन्धि प्रतिभानमद्भुतम् ।
श्रुतेन यत्नेन च वागुपासिता
ध्रुवं करोत्येव कमप्यनुग्रहम् ॥

—काव्यादर्श.

साहित्यशास्त्राचें परिशीलन करून, काव्य रचण्याचा अभ्यास केल्यानें व सरस्वती देवीची उपासना अंगिकारल्यानें, देवी प्रसन्न होऊन कांहीं ना कांहीं तरी अनुग्रह केल्यावांचून ती राहायचीच नाहीं, अशी दृढ भावना जर अंतःकरणांत असेल, तर काव्यमीमांसाकारांनीं म्हटल्याप्रमाणें कवीच्या कारणपरंपरेंत—स्वास्थ्य, विद्वत्कथा, स्मृतिदार्ढ्य व अनिर्वेद या चौकडीच्या भरतीची आवश्यकता न उरतां, वरील त्रयीच कविकारणाची उत्तम पोषक होते.

काव्यरचनेच्या प्रकारासंबंधानें वामनाचार्यांनीं जें 'रीतिरात्मा काव्यस्य' असें म्हटलें आहे, त्यालाच अनुसरून मम्मटाचार्यांनीं त्या 'रीति' शब्दाला 'वृत्ति' असें नांव दिलें आहे. या रीति अथवा वृत्ति काव्यकारांनीं सहा प्रकारच्या मानिल्या आहेत. वैदर्भी, गौडी, पांचाली, लाटिका, मागधी आणि आवन्तिका ह्या त्या होत. या सहा प्रकारांपैकीं प्रस्तुत पुस्तकांत फक्त 'गौडी' रीतीची काव्यरचना अंगिकारिलेली नाहीं. कारण, तिच्यांतील वर्ण बहुतेक सर्व अत्यंत कठिण स्वरूपाचे व 'ट' वर्गातले आणि 'क्ष'सारखे तीक्ष्ण असून, तींत मोठमोठ्या कठीण समासांची रेलचेल असते. शिवाय रूढीविरुद्ध अर्थांची शब्दयोजना त्यांत असल्यानें, वेळीं तिची रचना करणाऱ्या कवीसही तिचा अर्थ लागण्याची मारामार पडते. इतकेंच नव्हे, तर संस्कृतज्ञांसहि तशा रीतीच्या कवित्वांतून अर्थ काढणें अनेकदां अशक्य होऊन बसतें. क्लिष्ट रचना जरी असली तरी तीहि एका प्रकारची विशिष्ट पद्यरचना असल्यानें तिचाहि अवलंब याच्या पुढच्या भागांत मीं थोडकासा उदाहरणार्थ म्हणून केलेला आहे; कारण, ती रचनाहि काव्यात्मभूतरसाची उपकर्ती आहे.

ज्याच्या वाचनश्रवणादिकांनीं मनुष्याचें चित्त क्षणभर तरी अमृतसरोवरांतील आनंद अनुभवूं लागतें व दुःखी प्राणी सुखी होऊं शकतो त्यालाच काव्य असें म्हणावें, आणि म्हणूनच 'ह्लादैकमयी' असें काव्यप्रकाशाच्या नांदांत भारतीला म्हटलें आहे. अग्निपुराणांत 'काव्यालापाश्च ये केचिद्गीतकान्यखिलानि च । शब्दमूर्तिधरस्यैते विष्णोरंशा महात्मनः' असें याचें माहात्म्य वर्णिलें आहे. रुद्रटानें प्रतिभाशक्तीसंबंधानें 'मनसि सदा सुसमाधिनिविस्फुरणमनेकधाभिधेयस्य । अक्लिष्टानि पदानि-च विभान्ति यस्यामसौ शक्तिः' अशी जी व्याख्या केली आहे, तिचें चित्र माझ्या या प्रयत्नांत कितपत उतरलें गेलें आहे हें पाहण्याचें काम तज्ज्ञ रसिकांचें आहे. मीं हा प्रयत्न केवळ संस्कृतानभिज्ञ अशा लेखक, वक्ते, हरिदास वगैरेंसाठीं मुद्दाम नव्या दिशेचा केला असून, यांत मराठी कवींचे वेंचे न घेतां संस्कृत कवींचीं सुभाषितें छंदोबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. केशवसुतांस एका कवीनें प्रश्न केला तेव्हां "मीं कांहींच केलें नाहीं" पण—

**" नव्हे तैसेंही ! कवी वदे त्यातें ॥**
**काव्य लिहिलें मीं खरें, परी मातें ॥**
**शारदेनें जो मंत्र दिला कानीं ॥**
**तसें लिहिलें मीं;—काव्य तिचें मानीं !"**

असें जें म्हटलें आहे तेंच मीहि माझ्या या प्रयत्नासंबंधानें म्हणतों व माझे कविमित्र रा. हरि सखाराम गोखले यांनीं माझ्या या पुस्तकांतले जे कांहीं दोष दाखवून मला ऋणी केलें आहे त्याबद्दल त्यांचे अनेक आभार मानून, वाचकांस इतकेंच सविनय सांगतों कीं, यांत माझें असें नवीन कांहींच नाहीं. महान् थोर संस्कृत कवींचें उच्छिष्ट सेवन करून त्याचाच हा मराठी आदर्श आपणांपुढें मांडण्याचें धारिष्ट करतांना केशवसुतांच्या—

**" दिव्य शक्तीनें स्फुरे गंध पुष्पीं, रंग खुलतीही तिनें इन्द्रचापीं;**
**सृष्टिमाजीं जें रम्य असे कांहीं तीच कारण त्या शक्ति असे पाहीं !"**

या अनुपम वाणीच्या उल्लेखानें ही प्रस्तावना पुरी करतों.

सुभाषित-पारिजात-संपादक,

**लक्ष्मण नारायण जोशी.**



मैम्बर कौन्सिल ऑफ स्टेट

ब्रह्मणस्पते,—

गणांच्या अध्वर्यो प्रमुख कविवृन्दीं यश असें
जयाचें अन्यांच्या अमुप उपमाकारणिं वसे
ऋषींच्या ज्येष्ठेशा, श्रुत करुनि आवाहन तरी
विराजे आसन्दीं सहित–उपदां त्या झडकरी ॥

बल श्रद्धा मेधा यश वय सुविद्या मति तशीं
द्युति प्रज्ञा श्री ह्रीं वरुत सुचिरारोग्यि मजशीं
गणेशाक्षिक्षेपें गतविभवलाभप्रकटना
करो ती सिद्धा तच्चरणकमलोत्कृष्टघटना ॥

**गणेशश्रीकृष्ण** प्रकृति उभयांमाजिं वसुनी
द्वयांना प्रेमें श्री उभयकरिं ती सांवरि जना
स्मितज्योत्स्नापात्रस्तवन तिजला हें अभिमतें
रुचो भाग्यीं लाभो उपकृतिंत **सौमित्र–कवितें** ॥



सुभाषित-पारिजात-संपादक

लक्ष्मण नारायण जोशी.

REFBK-0002364

श्रीलक्ष्मीकेशव प्रसन्नोऽस्तु.

# मराठी

# सुभाषित-पारिजात.

## देवतादिनमन.

शार्दूलविक्रीडित.

शुंडादंडबिसाबरी लघु अती नेत्रद्वयांचीं फुलें ।
बाहे गंडज त्यांतुनी मधु जया पीती अलींचीं कुलें ॥
दोंहींभागिं सुशूर्पकर्ण हलते पर्णाकृती शोभले ।
ऐसा जो गणराज चारुमुखि तो देवो समस्तां भलें ॥ १

गीति.

युगपत्स्वगंडचुंबनलोलुपपितरां बघूनि स्वानन तें ।
अपहरि, तन्मुखमेलनिं हंसतो तो गणप देउं अवनातें ॥ २

वसन्ततिलका.

ज्ञानाब्धि जो असुनि धीपति सर्वसाक्षी ।
ॐकाररूप गुणपुंगव भक्त रक्षी ॥
मोक्षार्थ धीरपुरुषें हृदयीं जपावा ।
तत्पादधूलिकणही स्वशिरीं धरावा ॥ ३

द्रुतविलंबित.

जल-सुभाषित-अन्न गजाननें ।
त्रिमणि हे दिधले सुखकारणें ॥
उपलखंड मणीसम मानिती ।
अबुध ते स्मरती न सुधीपती ॥ ४

वसन्ततिलका.

लोकीं जयासि वदती शिवशक्तिपुत्र ।
तो पूजिला जगत्पित्यांनिंहि वक्रवक्त्र ॥
आम्ही प्रजा अनुसरूनि शिवामृडांला ।
आशीर्वचांसि मिळवूं तरण्या जडाला ॥ ५

द्रुतविलंबित.

सुख अहंपण सेवक सोडिती। धरुनि आस धनांत सर्वेचि ती ।
सुख तदीय अहंपण नासतां ! म्हणुनि व्हा शरणागत धीपती ॥ ६

स्रग्धरा.

प्रारंभीं पूज्य झाला गणपति व्रतबन्धांत तो शंभुच्याही ।
अंबाशूलीविवाहीं प्रथम गिरिवरें तोचि हो पूजिलाही ॥
मुंजीमध्यें स्वतांच्या स्वपदसुमभरें आद्यपूजेसि पाही ।
ऐसा हो धीपती तो सतत धरणिजां मंगलीं नित्य पाही ॥ ७

शार्दूलविक्रीडित.

श्रीन्मंगलधाम विघ्नहर तो वंदूं जया पत्नि धी ।
स्वेच्छें आत्मविवाह विघ्नहरणीं जो पूज्य झाला अधीं ॥
आर्योत्कर्ष तदीय मंगलवरें पावोनि सत्सिद्धितें ।
देशोद्धार करावया सुजन ते लाहोत सद्बुद्धितें ॥ ८

स्रग्धरा.

स्कंदाचा मोर येतां परिसुनि मुरजा वाजवी नन्दि ज्याला ।
शुंडारन्ध्रांत गेला फणिपति भिउनी नक्रसंकोच झाला ॥
गंडस्था भृंगमाला उडुनि मुख रितें शंभुच्या तांडवींचें ।
चीत्कारा पात्र झालें गणपतिविधुचें पावना देउं साचें ॥ ९

शिखरिणी.

स्थिरैश्वर्या वाणी खचुनि भरली ज्या हृदिं मुदें ।
तयाला पाहोनी लपलिं दिपलीं रक्तकुमुदें ॥
असा बोधात्मा तो श्रुतितति जयामाजिं दिसती ।
नमूं त्या ॐकारा गणपति जया सर्व म्हणती ॥ १०

स्रग्धरा.

कल्पांतीं क्रूरकर्मा क्रतुकदनकरो कुंदकर्पूरकान्ती ।
क्रीडे कैलासकूटीं कलितकुमुदिनीकामुकी कान्तकुन्थी ॥
कंकालक्रीडनोक्ता कलितकळकली कालकालीकराली ।
कालिंदीकालकंठी कृति करुं कुशला कार्यकारी कपाली ॥ ११

शिखरिणी.

श्रुतिस्मृत्यादींच्या स्वरुपिं अवतारा धरुनियां ।
विवस्वच्चंद्रांना धरि स्वकिय साक्षीस बसण्या ॥
जियेला देवांना नमन करितां सिद्धि मिळते ।
नमूं ती वाग्देवी यदिय स्मरणें दुःख टळते ॥ १२
करी साक्षात्कारें विमलतर ब्रह्मांड भरतें ।
चिदाभासें दावी कणकणिंहि प्रत्यक्षपण तें ॥
पहा जो यच्चावत् चर-अचर सृष्टींत विलसे ।
नमस्ते आत्मा तो श्रुति वदति ज्यातें नर असें ॥ १३
अहा जीवात्मा तो कथिति नरसंज्ञात्मक असा ।
जयाला राहे तो सतत धरुनी आश्रयि तसा ॥
तयाला संबोधी अखिल श्रुति नारायण असें ।
नमस्ते आत्मा तो उघडचि नराकारण वसे ॥ १४
जयाच्या कार्यी तें जननि परमात्मा स्फुटरवें ।
धरी अंगीं भारी पृथकपण श्रेष्ठत्व बरवें ॥
सदा भासे सच्चिन्मुदकृतिस ॐकारचि कसा ।
नमस्ते आत्मा तो परम करुणात्मा शिव तसा ॥ १५
अशा त्या आत्म्याच्या त्रिगुणयुत निर्दिष्ट उपरी ।
यथार्थ ज्ञानातें करुनि मन संतुष्टचि करी ॥
जियेला नादात्मा स्वकिय हृदया जाणुनि वरी ।
नमी मी देवी ती पशुपतिसुताचीच नवरी ॥ १६
जगन्माता ऐशी परमकरुणायुक्त उठली ।
ममात्म्याचे ठायीं स्फुरण करण्या स्पष्ट नटली ॥

## प्रास्ताविक.

गीति.

संस्कृत प्राकृत सारे परिणत अधुनिक सदैव ते सुकवी,
प्रेमें मस्तकिं धरुनी कविता करि मी जुन्यांतुनीच नवी ॥ १

शार्दूलविक्रीडित.

या ग्रंथीं निवडूनियां विषय ते बुद्ध्या न मीं मांडिले,
रोषा सोडुनि पाहिजे तुम्हि तरी ध्यानांत हें ठेविलें:
मिर्चीचा झटका मधें नच मिळे जिव्हेस सेवावया:
ती हो रुष्ट पदार्थ एकचि सदा सत्प्रीतिनें खावया ॥ २

## भाषांतराची आवड कां ?—

उपजाति.

गीर्वाण भाषा मज आवडीची,
भाषांतरीं लोलुपता मनाची:
सुरा सुरांना जरि प्राशनाला,
ते लुब्ध योषाधर-आसवाला ॥ ३

## कविताकान्ता कोणाचें पाणिग्रहण करते ?—

शार्दूलविक्रीडित.

भ्राता मानुनि तार्किका, वदतसे शब्दज्ञ त्या बाप ती,
मीमांसानिपुणास षढ गणुनी त्या अर्पि कुत्सा तती:
दूरी मानुनियां अशुद्ध पळते चांडाळवच्छांदसा,
काव्यालंकरणज्ञ त्यास कविता कान्ता वरी कान्तसा ॥ ४

## रममाण होण्यासाठीं कविता कोणाला माळ घालते ?—

शालिनी.

वैयाकरणा बाप मानूनि वागे,
मीमांस्यालें षढ ती मानि रागें:
तर्कशास्त्रि भ्रातृवत् मानुनीयां,
काव्यज्ञाला माळ घाली रमाया ॥ ५

कवीच्या मतें कवितार्थ कसा असावा?—

वसन्ततिलका

अर्धोन्मिलीत मरहट्टवधूस्तनाभा,
काव्यार्थ देइ सम उत्तमशीच शोभा;
ना गुर्जरीस्तनसमान निगूढ ऐसा,
आन्ध्रीकुचांसम विघट्ट न तो हि तैसा ॥ ६

हें सर्व स्मरणांत ठेवून शेवटीं कवि विधात्याला म्हणतो.—

द्रुतविलंबित.

इतर पापफलें मज दे तुकें,
सहिन तीं चतुरानन, कौतुकें;
परि शिरासि नको लिहुं माझिया,
अरसिकांस कवित्व कथावया ॥ ७

---

# सुभाषित--पारिजात--प्रारम्भ.

भामाचुंबनशान्तिप्रदान—

स्रग्धरा.

आकाशा सोडुनीयां अवनिवरि शशी पातला या भ्रमानें
ग्रासाया राहु येई तव वदन पहा अंबरीं संभ्रमानें;
ऐकोनी शंभुवाणी मुखविधुस करी पार्वती ऊर्ध्वप्रान्तीं,
चुंबी शूली शिवा, तद्वितथ गुरु गिरा देउं तुम्हांस शान्ती॥ १

भाषेंत अपशब्द राहण्याचें कारण—

गीति.

जरि नटगणकचिकित्सकवैतालिकवदनकंदरें नसतीं,
वैय्याकरणाकिरातें अपशब्दरुरूंस मारिलीं असतीं॥ २

विवेकशून्यत्वाचा परिणाम—

उपेन्द्रवज्रा.

विवेकशून्यत्व जयांत भारी,
परस्परांतें नच साह्यकारी;
कुभूप तैसे कुत्र उन्नतीला
चढोनि जाती फिरुनी लयाला. ॥ ३

कामोत्सुकाची धिटाई—

गीति.

आच्छादिसि कां गे तूं मुग्धे, वस्त्रें तुझा असा अधर
क्षतचिन्हांकित शोभति वीर तसे अधर ते उरोजधर॥ ४

राजाश्रयहीन कवि राजकृपेचें शंभुस्वरूपांत वर्णन करतो—

मंदाक्रांता

शूली झालों कदशनवशें, भैक्ष्ययोगें कपाली,
वस्त्राभावीं गगनवसनी, स्नेहशून्यें जटाली,
ऐसें राजन् तव परिचयें दीधलें ईश्वरत्वा
तैसें भाग्यें न च नवल तें अर्धचंद्रास या त्वां॥ ५

काव्यप्रशंसा—

स्वागता.

काव्यरंग धरणीवरि येई
चित्रवेष उपमानटि घेई
चित्तरंजन करी रसिकांचें
नाचवी तनुमनां बहु साचें ॥ ६

सवतीमत्सरानें राधा मुरलीला अनुलक्षून म्हणते—

शार्दूलविक्रीडित.

सौधस्थान मुखारविंद हरिच्या वक्त्रासवा प्राशिशी
अंगुष्ठा उशि ती करूनि मृदुशा शय्याऽधरीं नीजशी
बोटें श्रीहरिचीं दुजीं तव करीं संवाहनीं सिद्धशीं
हा हा वैरिणि ! या सुखीं मुरलिके निद्रा न ये कां तुशी?॥ ७

गंगामहिमा—

गीति.

स्वर्धुनि तव महिम्यातें वर्णु शकेना फणीन्द्रही लोकीं
अच्युतपदच्युता परि अच्युतपद देसि गे जनां नाकीं ॥ ८

कांहीं करा, पण प्रसिद्ध व्हा !—

अनुष्टुभ्.

घटा फोडा पटा फाडा । काढा कीं रासभस्वरा,
येन केन प्रकारानें । प्रसिद्धी अपुली करा ॥ ९

जारिणी स्त्री व तिचा पति यांच्यावर रूपक—

स्वागता.

पुत्रलालन पती करितांना
जारिणी हंसतसे बघतांना;
रक्षणीं वपुधनां मनुजांना,
भूमिमृत्यु हंसतो सम त्यांना. ॥ १०

**पक्की निराशा —**

शार्दूलविक्रीडित.

रोतें आइ धरा, जरी सम तशी मारी स्वपुत्रा सती,
घेला लाघें संस्थिती, सम तया जाळी कृशानु क्षिती;
आकाशें जनमस्तकां चुरडिलें, खाद्यें विखीं जाहलीं,
अन्याय क्षितिपाल तो जरि करी त्यातें न कोणी बली॥ ११

**श्रीकृष्णीनें मुरलीचा स्वीकार कां केला ?—**

शिखरिणी.

गतप्राणा होते विरहदहनें जी गुणवती,
सुसप्राणा होते अधरमिलनें ती जशि रती;
अशी प्रेमाळूची जगतिं दुजि नाहींच उरली,
म्हणूनी कृष्णानें अधरिं धरिली साच मुरली ॥ १२

**भारत, ऊंस आणि चंद्र यांचें साम्य—**

गीति.

भारतइक्षुशशींचें वर्णन एकाग्नि कोणचें आहे ?
प्रतिपर्वीं रस चढता, वदतो जो हें असत्य तें नोहे १३

**शिवविष्णुस्तुति—**

शार्दूलविक्रीडित.

ज्याचा सूनु कुमार, जो शिरिं धरी गंगा सुमाच्या परी,
वामासंग करी गरीश धरि जो मोदें ध्वजाच्या वरी;
लंकेशोकपतिकृता हिमरुचि क्षोभ्याश्रयी तोचि हो
वर्णारंभनलोपनें हराति जे पापें स्मरा त्यां अहो ॥ १४

**दुर्मद आणि कार्पण्य यांना शाप—**

शार्दूलविक्रीडित.

विद्यें दुर्मद ये जयास सम तें कार्पण्य संपत्तिनें,
देवें शाप तयासि होय दिधला ऐसें म्हणावें जनें;
अग्नी नीरज तो असूनि मनुजा जाळी, तसें हें जगीं
दोघेही हतभागि होत समजा वाणी न हे वावगी ॥ १५

**ढेंकूण कसा असतो ?—**

शार्दूलविक्रीडित.

सर्वस्वापहरी न तस्कर, तसा [illegible]शनि [illegible],
भूताविष्ट न भूत तो, उरगही [illegible]ळी जरी [illegible]स,
अंतर्धान परी न सिद्ध, [illegible] तो वर्गांपिका [illegible]त,
आस्यें तीक्ष्ण न बाण, [illegible]वि असला जाणा तु [illegible]डित ॥ १६

**परस्परप्रशंसा—**

अनुष्टुभ्.

उंटाच्या सदनीं लग्नीं । गर्दभे शान्तिपाठनीं:
वाखाणिती एकमेकां । 'अहो रूपमहो ध्वनिः' ॥ १७.

**मित्रा, ती कोण चालली आहे पाहा बरें ?—**

स्वागता.

मंद मंद गमना करिणी कीं ?
दीर्घप्रान्तनयना हरिणी कीं ?
पूर्णचंद्रवदना रजनी कीं ?
पाहि मित्र नयनीं वदतों कीं ? ॥ १८.

**सत्पुरुषसंगतीचा लाभ—**

गीति.

सत्पुरुषांनीं साक्षात् उपदेशातें जरी न हो केलें,
संगतिच्या स्वैरकथा त्यांच्या आग्यासि देति बहुकालें ॥ १९

**याचनेंत अर्थ नाहीं—**

वसन्ततिलका.

दैवा समर्पि चिरसंचित कर्मजाला,
स्वास्थ्यें सुखें वस नसे फल याचनेला;
मेरूसि घालि रवि रोज प्रदक्षिणेला,
सप्ताश्व होति परि अष्ट न तद्रथाला ॥ २०

कोणी दारिद्यानें गांजलेला म्हणतो—

गीति.

दारिद्या नमन असो सिद्धचि झालों तुझ्या प्रसादानें;
जगता मी बघतों परि त्याला मी दिसत ना स्वनयनानें ॥ २१

अखेरीस स्वकर्मच संगतीं येतें—

भुजंगप्रयात.

धरोदरीं श्री पशु ते स्वबंधनीं
भार्या गृहद्वारिं सुहृद् श्मशानीं
अग्नीमधें देह जळोनि जातां
कर्मांविणा कोणि न येइ हातां ॥ २२

शंखनिंदा—

गीता.

कीटगृहा कुटिलहृदा कठिणा क्षारांबुसंभवा शून्या,
शंखा, श्रीपति करिं तूं कोण गुणें वससि रे असा धन्या॥२३

बकानें केलेली चंद्रनिंदा—

शार्दूलविक्रीडित.

मातें दोन असोनि पक्ष वरि मी मीनप्रसेवी असा
शुभ्रांगी, शशि तो कलायुत सदा माझ्या सरी हो कसा?
स्थाणूच्या शिखरीं निवास करि मी! चंद्रा असा तो बक
हांसे! दुर्जन मत्सरें सुजनिचे ऐसेच कीं निंदक ॥ २४

मितभाषणी नसल्यास काय होतें ?—

अनुष्टुभ्.

जिव्हे प्रमाण राखी गे। भाषणीं मानरक्षणीं
अतिपानरतीवोक्ती। होते ती मानहारिणी ॥ २५

पुढील आठ गोष्टी वाढवाव्या तितक्या वाढतात—

गीति.

आहार कलह निद्रा द्यूत सुरा कीं पराविया नारी
कंडू मैथुन, वाढति जितकीं सेवावि तितकिं तीं भारी ॥ २६

**थोरांचें निसर्गसिद्ध वर्तन—**

शार्दूलविक्रीडित.

आपाताल गभीरनीर बघुनी मारी उडी तो करी,
संतापा हरण्या निदाघसमयीं सौख्यास तेव्हां वरीः
झालें पंजर तच्छरीर ऱ्हद तें स्पर्शा न तो जाणतो;
थोराची कृति ही अशीच असते, क्षुद्रा न तो मोजितो ॥ २७

**लोभफळ—**

गीति.

लोभाविष्ट जनाचें मन बघतें कधिं न भाविची विपदा,
मार्जार जसें दुग्धा परि लगुडातें स्मरे न तेंहि कदा ॥ २८

**विरहिणीच्या प्रियकराला दूती खुबीनें सांगते—**

मन्दाक्रान्ता

जों जों वाढे प्रतिदिनिं कळा पूर्णकामी शशीची,
तों तों होई द्युतिमयवपु क्षीणशी त्वत्प्रियेची;
वाटे धाता घडवि विधुला सारमादाय तीचा
जाई भेटे उदय नच हो जोंवरी पौर्णिमेचा ॥ २९

**सुदर्शनादि श्रीकृष्णाच्या वस्तूंची गोपीवर उत्प्रेक्षा—**

गीति.

रूप सुदर्शन तूझें वदन सरोरुह सुहास्य नंदकसें
कौमोदकी हरिकरीं गोपी राहसि कदा न हेंच कसें ? ॥ ३०

**म्हाताऱ्या पण कामी अशा पुरुषाचे दुःखोद्गार—**

वसन्ततिलका.

दंतावली पडुनिया वपु दीन झाला
केशांस फेनधवलत्व न खेद याला;
पर्णीदृशा युवति त्या मजला बघोनी
ताता वदोनि व्रण ते करिती शतांनीं ॥ ३१

सद्वृत्त नायकासंबंधानें विरहिणीला सखी म्हणते—

शिखरिणी.

असद्वृत्ती ज्याची नच वरगुणांनीं रहितसा
पडे मुक्ताहार स्रवुनि तव पादस्थाळीं कसा
धरी त्यातें भद्रे, सतत तव कंठप्रणयिता
दुजा नाहीं कोणी तव हृदयतापोपशमिता ॥ ३२

दैव फिरलें असतां हवें तें होतें. हिरण्यकशिपु म्हणतो—

शार्दूलविक्रीडित.

जेथें कुंठित दंतिदंतमुसळें पिष्टेंचि झालीं खरीं
धारा झालि जिथें शिवःपरशुची हीनाच ही वैखरी
त्या माझ्या उदरा नृसिंहनख तें फाडूनियां टाकितें
झालें दुष्ट कपाळ तें, तृण तरी वज्रास हेंटाळितें ॥ ३३

वेणुनादश्रवणानें तल्लिन झालेल्या गोपी कशा दिसल्या ?—

रथोद्धता.

तुंगपीनकुचकुंभशोभिनी । वक्षसंचलितचैल गोपनीं
वेणुनादहृतचित्तकामिनी । चित्रवच्चलदृशा अशा वनीं ३४

अहंकाराचा बुद्धीला उपदेश—

दिंडी.

अहंकारें कथियलें बुद्धिलागीं
परममोदा सुप्तसा राहुंया कीं
उदित हो तो तरि तूं न मीहि तैसे
जगतिं सारें होउनी नष्ट बैसे ॥ ३५

मारुतीनें दिलेल्या अंगठीला पाहून सीता म्हणते—

शिखरिणी.

प्रियेनें गेहीं गे, गहन विपिनीं मीं त्याजियलें
मदीया रामातें, तुजसि कळलें हें न सगळें

तया मुद्रे तूंही त्यजुनि इकडे आलिस अतां
घरीं योषांचा तो वद कवण विश्वास सवता ? ॥ ३६

शास्त्रवाद्यांची योग्यता—

दिंडी.

शास्त्रवाद्यांचें अर्थ-हरण मोठें
काय वर्णावें तरी तेंहि कोठें ?
अव्ययांतुनि अर्थ ते काढिताती
म्हणुनि त्यांना भूवरी सर्व गाती ॥ ३७

कोण कोठें पूज्य असतो ?—

अनुष्टुभ्.

स्वदेशीं पूज्य तो राजा । विद्वान् सर्वत्र पूज्य तो
स्वगृहीं पूज्य तो मूर्ख । अधिकारी पुरींत तो ॥ ३८

चिरकाल मैत्री कोणांत टिकते ?—

मालिनी.

सरळ हृदय ज्यांचें होय सख्यत्व त्यांचें
कुटिलहि हृदयांचें होय मित्रत्व साचें
जरि सरळ खळांची मैत्रि झाली तरी ती
त्वरित वरिल चापीं बाण याचीच रीती ॥ ३९

मृत्यूला अवश कोण नाहीं ?—

गीति.

पंडित मूर्ख दरिद्री श्रीपति बलवान् कुटील कीं अबल
मृत्यूला सर्वहि ते वश असती यांत काय तें नवल ? ॥ ४०

वस्त्रमलिन दरिद्याची स्थिति—

वसन्ततिलका.

वस्त्र प्रधान असतें जगिं मान्यतेला
दुर्वस्त्र जो शिवत श्री कधिं ना तयाला
पीतांबरार्पण करी जशि इंदिरेला
सिंधु बिषा सम तसाच दिगंबराला ॥ ४१

द्रविडगृहांतील तुपाच्या बुटकुलीची थट्टा—

वसन्ततिलका.

आनंदतांडवपुरीं द्रविडगृहीं ती
होती अरुंधतिसमानचि आज्यगोती
विद्युल्लतेव पळि नाचत तींत होती
धारा दिसे पडलि योगबळेंच हो ती ॥ ४२

स्त्रीजित पुरुष कलंकी कसे होतात तें ऐका—

वसन्ततिलका.

लोकीं कलंक झडण्याकरितां मृगांकें
स्त्रीचें मुखस्वरुप तें धरिलेंच ऐकें
तत्रापि गोंदुनि तयासि कलंकि केलें
तस्मात् स्त्रियाश्रित पुरूष कलंकि झाले ॥ ४३

इष्टशृंगारभोग न देणाऱ्या प्रियकरास पाहून नायिका म्हणते—

शार्दूलविक्रीडित.

सोल्हासें वचना वदूनि मजला इष्टास ना प्रार्थिसी,
रात्रीं दीर्घ असे बहुत समया निश्वास कां सोडिसी ?
कंठालिंगानें दाविसी शिथिलता आसक्ति ना चुंबनीं
धूर्ता, यावरुनी दुजी सखि असे तूझ्या कुणी ती मनीं ॥ ४४

कामी कामोपभोगासाठीं कसे हाल सोसतात तें पाहा—

वसन्ततिलका.

रत्नाकरा त्यजुनि मौक्तिक दूर झालें,
वेधासमान अति तापद दुःख त्यालें;
वक्षोजकुंभपरिंभणलोलुपत्वें
केलें तयें सहन हें रतिसारतत्वें ॥ ४५

प्रियकर आपल्या प्रियेला लाडकेपणानें म्हणतो —

अनुष्टुभ्.

स्मर कान्ते मला तूं गे। मी तुला स्मरणार ना
स्मृति हा धर्म चित्ताचा। तेंच तूं हरिलीस ना ? ॥ ४६

प्रापंचिक मूढ कसा असतो?—

गीति.

प्रापंचिक जन चौकशि करितो इहलौकिच्याच देशांची
मूढ असा तो धरी नच जिज्ञासा यमपुरःप्रदेशांची ॥ ४७

प्रत्येक कुलांत एखादाच थोर कदाचित् होतो—

शिखरिणी.

करी शीले बाला चरणरजसें यत्कुलज तो
असा सूर्य क्षोणीवरिल गिरिखंडां तुडवितो
प्रती वा[illegible]ं नेमें, परि सुवाते नाहींच घडली
असा जन्मा येतो पुरुष अवघा एकचि कुळीं ॥ ४८

मेघाला विनंति—

शार्दूलविक्रीडित.

बा मेघा जलसंचया न च तु[illegible] भोगावयाचा तरी
स्वेच्छेनें स्थळ कोठल्या तरि तया टाकूनि देण्यापरी
जेथें ते तव नीरबिन्दु पडतां मौक्तीकराशी बने
ऐशा त्या स्थळिं कां न त्या[illegible]विशीं सत्सारवाही मनें ॥ ४९

मेघाला प्रश्न—

गीति.

पाथोनिधिमधें [illegible] पाथा विजरासे पाथोद कां वृथा सगळें
रविक[illegible] अशा चातकपानां न देसि कां अगळें? ॥ ५०

थोर अशा दुसऱ्यभावावर उत्प्रेक्षा—

गीति

इतरांसाठीं [illegible] छाया पर[illegible] परार्थ ते करिती
फळती दुसऱ्यांकरितां थोरद्रुम [illegible] असेच तद्रीती ॥ ५१

सीतेच्या जागीं रात्रच रामापाशीं कां राहिली?—

गीति.

सीताविताकुल [illegible] राम तदा झोंप सोडुनी गेली
एकाकी [illegible] म्हणुनी रजनी [illegible] त्यागिनी न ती झाली ॥ ५२

कोणी गरीब कोणा लब्धप्रतिष्ठितास भेटायला गेला असतां त्याला मिळणारीं कांहीं उत्तरें—

शालिनी.

कोणी सांगे बाह्य देशासि गेले
कोणी सांगे आलयीं सुप्त झाले
कोणी ठेवी हस्त कर्णप्रदेशीं
कोणी सांगे कार्यबाहुल्य त्यांशीं ॥ ५३

जीव आणि शिव यांचा संबंध—

दिंडी.

देहबुद्धीनें साच तुझा दास
जीवबुद्धीनें होय तुझा अंश
तत्वबुद्ध्या तूं आणि मीहि एक
हेंचि सिद्धांतस्वरुप ठरावीक ॥ ५४

भक्तमनोरथभंगाचें दुःख विष्णूला समजविण्यासाठीं कोणी भक्त लक्ष्मीला म्हणतो—

वसंततिलका.

लक्ष्मी तुझ्या पदिं हरि प्रणमील जेव्हां
राही अशी प्रकुपिता घटिकाच तेव्हां
भक्तासि ईप्सितमनोरथभंगदुःख
हो, ते प्रभूस कळुं दे विनतीस राख ॥ ५५

गुणज्ञ आणि गुणिजन—

पृथ्वी.

गुणज्ञ मन तें रमे गुणिजनांचिया संगतीं
परी कधिं न सेवि तें अगुणमैत्रिची दुष्कृती
दुरूनि अलि धांवतो वनसरोज तें सेवण्या
तदीय निकटप्लवा परि न बुद्धि ती भोगण्या ॥ ५६

हिरवा आणि शुभ्र या दोन रंगांच्या मिश्रणाचें कौतुक—

गीति.

नलिनीपत्रांमध्यें बकश्री ही दिसतसे कशी आहा !
पाचूंच्या पात्रीं जें शुक्ति दिसे नवळ हें अहो पाहा ॥ ५७

थोरांचा अस्त सज्जनांस दुःसह होतो—

शिखरिणी.

रवी अस्ता जातां उदित नभिं खद्योततति ती
मरालालीं मूका बहुत घुबडें घूक करिती
बघाया कष्टा त्या शुचिर सहमानांऽबुजवती
गमे क्ष्वेडा झाली मधुपमिलनें प्राशनवती ॥ ५८

भवन आणि वन यांतील फरक—

गीति.

विद्वज्जनपदपंकजरजःकणांनीं पुनीत जें होतें
त्यासी भवन म्हणावें, इतरत्र अलुप्त भानुषीं हो तें ॥ ५९

एकदां घडलेली सज्जनमैत्री कोठेंहि अविकारीच असते—

शार्दूलविक्रीडित.

कोठें ती वनखंडपंकजतती ? कोठें रवी तो असे ?
कोठें ती कुमुदावली ? सम तसा कोठें शशी तो वसे ?
तस्मात् सज्जनशी चिरापरिचयग्रंथी जरी दूरशी
झाली, ती अविकारशी तरि वसे, भाषा खरी ही अशी ॥ ६०

मेघ व समुद्र यांच्या गर्जनेंतला भेदभाव—

उपजाति.

तृषा धरेची शमवी अशेषा
तो मेघ गर्जे तरि ना विशेषाः
जगतृषा सिंधु कधीं हरीना
परंतु तो निष्फळ गर्जतो ना ? ॥ ६१

थोरांची कृति कधींच अप्रिय नसते—

गीति.

अप्रिय भाषण ऐकुनि मधु बोला बोलताति ते थोर ।
मेघ जसें क्षारोदक पीउनि करितात मिष्टसें नीर ॥ ६२

नदीनदांचा प्रियकरणीवर कवित्वारोप—

गीति.

कृष्णा गे तव वेणी, अंबुजनयने तुझा अधर शोण
होतो वियोग तूझा तापी, तूं सुरतरंगिणी जाण ॥ ६३

कसेंहि बोलशील तरी तूं माझी लाडकीच—

स्वागता.

गोड बोल अथवा कटु वाचा
खेद ना मज सखे मुळिं त्याचा
उष्ण शीत जल तें जरि राही
पावका शमवितें लवलाही ॥ ६४

मदनविव्हल पांथिकाचा भ्रम—

स्वागता.

अस्तगामि रविमंडळ होई
चंद्र साच उदयाचलिं येई
क्रोधमत्त मदनाचित्र हा तीं
पांथिकास नयनें दिसताती ॥ ६५

परस्त्रीच्या अभिलाषानें होणारी फजीती—

शार्दूलविक्रीडित.

अस्ताला रवि जाइ हें बघुनियां वेषांत सूर्याचिया
जायी ता अनुरागि हो शशि करें आलिंगना द्यावया;
होतां शीतल संस्पृशा कमलिनी झांकी मुखांभोरुहा
पोहोनी हंसली कुमुद्वति तयें झाला शशी पांडु हा ॥ ६६

टांकीच्या घावानेंच देवत्व मिळतें—

शार्दूलविक्रीडित.

सूचीचे व्रण सोशितो गुणि असा कंचूक, या कारणें
तुंग स्त्रीकुचमंडलीं सतत त्या होतें सुखें राहणें
शस्त्राघात पडूनि घोरसमरीं नाकीं रथीं जाति ते
स्वर्गस्त्रीकुचकुंभ हा कवळिती, आश्चर्य तें कोणतें ॥ ६७

क्षुधात्रास निर्लज्ज बनवतो—

गीति.

हृदयीं माझ्या लज्जा, परि उदरीं अग्निच्या भडकण्यानें
लज्जा जळुनी गेली, याचक बनलों क्षुधा कडकण्यानें ॥ ६८

उदरंभरणार्थ नको तें करावें लागतें—

दिंडी.

कोण कार्पण्या मीं न दावियेलें ?
देहलीला कोणच्या ठेवियेलें—
लंघण्यातें ? नाटकें कितिक केलीं
दुष्ट उदरा पोसण्या यथाकालीं ॥ ६९

मूळच्या अपवित्र परंतु शास्त्रपवित्र वस्तु—

उच्छिष्ट, शिवनिर्माल्य, । ओकारी शवकर्पट
काकविष्टासमुत्पन्न, । पांच वस्तू पवित्र ह्या ॥ ७०

शास्त्रशुद्ध परंतु मूळच्या अपवित्र वस्तु—

दुग्ध, गंगा, पुष्पसार, । चीनवस्त्र च पिंपळ
पांच या वस्तु मानीती । सोंवळ्या शुद्ध निर्मळ ॥ ७१

मामेला राधा म्हणते—

शिखरिणी.

मला त्यानें नेलें कथन करण्या कांहिं विजनीं
न ती शंका आली सरळ हृदयीं भाव म्हणुनी

तयें कर्णोपांतीं किमपि कथण्या आणुनि मुखा
धरूनी धम्मिला अधररस प्याला तव सखा ॥ ७२

विषयोन्मुखी पुरुषाचा पश्चात्ताप—

पृथ्वी.

कुचांसि परिचर्चिलें निशिदिनीं सुखें चंदना
सुगांधि सुमनस्रजां नटविलें तयां मीच ना?
श्रुतिस्मृतिनुति प्रियाप्रणयकारणीं दाविली
परंतु परमेश्वरार्पणिं कधीं न हीं योजिलीं ॥ ७३

माढवाला गुळाची काय चव?—

उपजाति.

जरी खरश्चंदनभार वाही
तरी तया चंदनगंध नाहीं;
तसाचि विप्र श्रुतिशास्त्रपूर्ण
ज्ञानी न तो हो जगिं जंतुवर्ण ॥ ७४

मेलेल्याला मारणें बरें नव्हे—

द्रुतविलंबित.

तरुणि सोडि न लोचनबाण ते
तृणलवास कुठार न साहते
मदनजर्जर मी वध सन्मते
हनन सज्जन गे करितीं न तें ॥ ७५

दोघे विद्वान् नवरे—

गीति.

चतुर सखे भर्ता मम लिखिता त्याच्या कुणी न वाचुं शके
त्याहुनि माझा अधिकचि स्वतांच लिहिलें स्वतां न वाचुं शके॥ ७६

पुरुषलक्षणें—

अनुष्टुभ्.

पात्रीं त्यागी, गुणीं रागी, । विरागी विषयीं महीं
शास्त्रीं बोध्दा, रणीं योध्दा, । लक्षणें पुरुषास हीं ॥ ७७

मदोन्मत्ताला स्वसंरक्षणाचा उपदेश—

गीति.

करिवर संचर धीरें मर्दुनि पर्णांत मर्मरा न करी
येथें गव्हरकुहरीं धूतसटी वसतसे भयाण हरी ॥ ७८

पुष्पलता आणि स्त्रीदेहलता यांच्या तारुण्यदर्शनांतील मौज—

गीति.

पुष्पानंतर वेली जिकडे तिकडे फलप्रसू होते
कनकलता धारण करि फलयुगलामागुनीच पुष्पातें ॥ ७९

तनुसंगमापेक्षां हृदयसंगमच टिकाऊ असतो—

स्वागता.

मी इथें असुनिही तव राहें
तूं तिथें असुनिही मज लाहे
हृदयसंगम संगम तो खरा
न तनुसंगम संगम तो जरा ॥ ८०

भावी दैवानुकूलतेवरील विश्वास—

शार्दूलविक्रीडित.

पानें जीर्ण फळें विनष्ट सम त्या छाया न ती राहिली
पक्ष्यांची कुळिही तया त्यजुनियां पाहा गता जाहली
सोडीना स्वसमुन्नतीस परि ती आशा धरूनी असा
राही रे सुमनप्रसू अनुदिनीं तुझी वसंता कसा ॥ ८१

प्रियालिंगनप्रभाव—

उपजाति.

परस्परालिंगनसौख्ययोगें
वक्षोज झाले साखे पुष्ट हे गे
कटीस ती तन्मुति साहवेना
कृशा दिसें मी म्हणुनी म्हणे ना ॥ ८२

द्रव्यतृष्णेनें हपापलेला म्हणतो--

स्रग्धरा.

लज्जे तूं सिंधुमध्यें बुडुनि, गिरिशिरीं जाइ गे तूं प्रतिष्ठे,
शान्ते प्रांतीं दिशांतीं वस, समाचि रे सर्वसा गर्व तिष्ठ,
तेजा पातालमूलीं दड, मम भगवन्मान नामास सोडी,
प्रेमानें द्रव्यतृष्णे, सतत तुजसि मन्मासानेंच जोडी ॥ ८३

बुद्धिविकास कसा होतो?—

गीति.

पढतो लिहितो बघतो पुसतो जो पंडितांस सुरसा धी
त्याची दिनकरकिरणैर्नलिनीदलसम विकासते बुद्धी ॥ ८४

विरहिणीला प्रश्न—

शार्दूलविक्रीडित.

पक्ष्माग्रांतुनि अश्रुबिंदु ढळुनी मुक्ताफलस्पर्धिनी
माला पीनकुचांवरी रचियली वाटे शुभे कामिनी
कां गे बालमृणालनालवलयालंकार हस्तावरी
टेंकोनी मुख बैससी, कवण तो धन्य स्मरीसी उरीं? ॥ ८५

सहजा सुंदरीला आभरणें कशाला?—

गीति.

सहजा च सुंदरी जी आभरणें तिजसि भार तीं होतीं
सर्वांगसौरभा जी दमनकवल्ली फुलें कशा तिस तीं? ॥ ८६

लोंचटपणाला नकारघंटेचें उत्तर—

शिखरिणी.

दुरूनी येण्यानें बहुत थकलों दे मजसि गे
तुझ्या ठायीं थारा, नवकुसुमिते च्यूतलतिके
असें बोले वारा मलयगिरिचा, त्या हलवुनी
शिरातें सांगे ती 'नाहि नहि नहीत्येव' म्हणुनी ॥ ८७

नकोगे बाई! हा नादलुब्ध होऊन, रात्र संपवणार नाहीं!—

उपजाति.

कोणी मृगाक्षी रजनी सराया
अतोद्य घेई करिं वाजवाया
तों दृष्टि पाही तदिया मृगांका
मंदस्मितातें करि ती शुभांका ॥ ८८

सुखसंपत्ति उद्योगाच्या छायारूप होऊं शकतात—

वसन्ततिलका.

उद्योगतत्पर सुबुद्ध अशा नराला
सत्साह्यकारि जरि मित्र असा मिळाला
होती तया अनुगता सुखसंपदा त्या
छायेसमान, दिसतें जगिं याच रीत्या ॥ ८९

ही मौक्तिकमाला कशी आहे?—

दिंडी.

मदनपाशीं बद्ध ही रति करी रे
प्रथमरासिची माळाच जाण ही रे
मदनराज्यीं उत्तुंगकुंभ बा रे
सजविण्यातें वाटतें अवतरे रे ॥ ९०

प्रियेचें मुख पाहून घरांतच चंद्रोदय झाला असें वाटलें—

दिंडी.

शिरोभूषण शोभतो दिग्वधूंचा
अंबरींचा तो राजहंस साचा
सुरतरसिंचा जो मूळकंद आहे
चंद्रमा तो सदनिं या उगवलाहे ॥ ९१

सायंकाळीं सूर्य कसा दिसतो?—

दिंडी.

पंकजांसह नयनांस झोंप देतो
मानिनींसह तीव्रता त्याजि असा तो

वृद्धयष्टी हो अस्तशैल ज्याची
जीर्णाग्रंबाचा दिसत तो मरीची ॥ १२

**मदनतप्ताची प्रियाराधना—**

शार्दूलविक्रीडित.

सीतांशू मुख, उत्पलें नयन ते, बाहू मृणालापरी
रंभागर्भसमान ऊरु, कर ते रक्तोत्पलें तीं तरी
आल्हादांगि अशी प्रिये मज मि तूं निःशंक आलिंगना
देवोनी, करि मारतप्तवपुला शीतस्थ, ही प्रार्थना ॥ १३

**चित्त, वाचा आणि क्रिया ही त्रयी सज्जनांतच सांपडते—**

अनुष्टुभ्.

जसें चित्त तशी वाचा । जशी वाचा तशी क्रिया
तिन्ही गोष्टी एकरूपें । सज्जनीं वसतात या ॥ १४

**प्रथम यौवनलक्षणें—**

पृथ्वी.

क्षणीं सरळ पाहणें, क्षणिक चोरुनी वीक्षणें
क्षणीं रुजासि खेळणें, क्षणिक डागिने घालणें
क्षणीं जलद चालणें, क्षणिक मंदता पावणें
क्षणक्षणविलक्षण प्रथम यौवनीं लक्षणें ॥ १५

**नूतन विवाहितांची दृष्टी कशी असते ?—**

गीति.

चोरुनि एकया पावुनि, लज्जेनें संकुचांकित जयांचे
होती नेत्र, तयांचे नूतनविवाहितविलास मोहाचे ॥ १६

**बा रहाटा, तुझा आक्रोश व्यर्थ आहे !—**

शिखरिणी.

कटाक्षांच्या फेंकी करुनि युवती या भ्रमविती
जगीं कोणालाही, कथन नलगे ती तव गती;
करीं तूंतें ओढी रमणि म्हणुनी कां वद असा
रहाटा, आक्रोशा करुनि रडसी व्यर्थांचे तसा ? ॥ १७

**मूर्खलक्षणें—**

गीति.

अप्रियवादी गर्वी हट्टी दुर्वच परोक्त मानीना
चिन्हें पांच अशीं हीं मूर्खाची थोर वदति हें माना ॥ ९८

## खरा नट कोणाला म्हणावें ?—

मन्दाक्रान्ता.

बाह्यज्ञाना विसरुनि जसा तापसी लीन होतो
आत्मानंदीं गिरिवरि, तसा रंगभूमीवरी तो
स्वीकृत् पात्रीं समरस बने भ्रांति पाडी जगाला
सत्याभावीं, जगतिं नट तो साच जन्मास आला ॥ ९९

## राजा आणि इक्षुदंड—

वसन्ततिलका.

तूं कांत नित्य मधुपूर्ण रसाळ ऐसा
प्रत्यक्ष पंचशरकार्मुक दिव्य जैसा
इक्षो, तुझ्यांत दिसलें परी न्यून हें कीं
होसी क्रमें कहनि नीरस तें विलोकीं ॥ १००

## अतिशयोक्ति—

शार्दूलविक्रीडित.

कांतारीं प्रियवल्लभासि बघण्या इंदीवराक्ष्या फिरे
संकेतें, स्फुटविद्रुमासम अशा ओष्ठद्वयांची अरे;
चोरांनीं हरिलीं समस्त विपिनीं भूषें तियेचीं परी
नासाभूषण ठेविलें गमतस आश्चर्य हें अंतरीं ॥ १०१

## एका मदनतप्ताचा व्यर्थी प्रश्न—

शार्दूलविक्रिडित

सुभ्रू केशकलाप संयमि तुझा, नेत्र श्रुतीपारसे
अंतर्वक्त्र तुझ्या स्वभावशुचि ती पंक्ती द्विजांची बसे
मुक्तांचा अधिवास संतत तुझ्या वक्षोजकुंभांवरी
ऐसा देह तुझा प्रशांत मग कां क्षोभास मातें करी? ॥ १०२

**उन्मत्ता तटिनीला व्यर्थ उपदेश--**

गीति.

तटिनी वर्षा जाइल निघुनी वैभव तसेंच तव, मागें
तटपादपपातनिचें पातक राहिल तुझ्या शिरीं जागें ॥१०३

**नैसर्गिक थोरांचा स्वभाव पालटत नाहीं—**

शिखरिणी.

मनस्वी जाती ते मरुनि परि कार्पण्य पदरीं
न हो स्वीकारीती पतितसम तें साच उदरीं;
जरी अग्नी जातो विझुनि तरि शीता न धरि तो
तसें थोरांचें हें व्रत जगतिं तथ्यांश कथितों ॥ १०४

**हिंदुहि नाहीं व मुसलमानहि नाहीं—**

शिखरिणी.

न संध्येतें साधी, नियमित निमाजा न पढतो,
न मुंजातें बांधी कटिस, नच सुंतेस करि तो,
न रोजा जाणे तो, व्रत न हरिचें कांहिं करितो,
न काशी मक्काही, यवन नच हिंदूहि गमतो ॥ १०५

**जामात हा दहावा ग्रहच प्रत्यक्ष असतो—**

अनुष्टुभ्.

सदा रुष्ट असंतुष्ट । वक्र जामात राहतो
दहावा ग्रह तो कन्या-। राशीला नच सोडितो ॥ १०६

**उत्तमाला शोभेची काय जरूर?—**

उपेंद्रवज्रा.

बरा दरिद्री श्रुतिशास्त्र जाणता
न मूर्ख तोही बहुरत्न सेविता ॥
सुलोचना जीर्णपटांत शोभते
न नेत्रहीना कनकांत भावते ॥ १०७

दोष हे श्रीमंताचे गुण कसे ठरतात म्हणाल, तर असे—

शार्दूलविक्रीडित.

आलस्या स्थिरता, तसोंचि म्हणती चापल्य कार्यास तें,
मूकत्वा मितभाषिता ठरविती, मौर्ख्यास सारल्य तें,
पात्रापात्रविचारणा नच असा औदार्यनामें वसे,
माते लक्ष्मि कृपा तुझी ठरविते दोषास सत्कृत्यसें॥ १०८

नीचाला अधिकारप्राप्ति झाली असतां तो दुःसह कसा होतो?

गीति.

रवि जरि देइ न तापा तादृश तरि वालुकानिकर देतो
अनक्रमालब्धपदें नीचाचि दुःसह बहुत ता होतो॥ १०९

चिरकाल मैत्री टिकण्यासाठीं तीन गोष्टी सोडाव्या त्या कोणत्या?—

गीति.

वाग्वाद. अर्थनातें, दाराभाषण परोक्ष या तीनी
विपुला मैत्री टिकण्या वर्जा या गोष्टि साच सुज्ञांनीं॥ ११०

अनंत गुण आणि अविंध कीर्तिमौक्तिक यांची माळ कशी गुंफली जाणार?—

वसन्ततिलका.

त्वत्कीर्तिमौक्तिकफळें तुझिया गुणीं त्या
झाल्या प्रवृत्त रचण्या विबुधप्रिया त्या
ना तो गुणान्त यशमौक्तिकिं रंध्र जात्या।
माला न होय म्हणुनी हंसु लागल्या त्या॥ १११

सीतेला रावणानें पळविल्यानंतर चंद्राला पाहून राम म्हणतो

शार्दूलविक्रीडित.

रे पाप्या तुज मंदरें मथियलें नाहीं अजुनी कसें?
राहूनें ग्रसिलें तुला न च कसें अद्यापि तें पूर्णसें?

आहे जानकिच्या मुखासम तुझी वक्त्राकृती ती तरी
विंधील म्हणुनी तुला न शतधा बाणें स्मरें अंतरीं ॥ ११२

संज्जनमनें कशीं अभंग असतात तीं पाहा--

दिंडी.

सज्जनांचीं तीं मनें कठिण भारीं
जगतिं असतीं वाटतें मला सारीं
खलवचांच्या तीक्ष्णशा वाग्शरांनीं
भंगताती न च कधीं मनीं मानी ॥ ११३

एका सत्संगतीनें उत्तमशीं तीन कार्यें होतात--

गीति.

गंगा पापा, तापा शशि, दैन्या कल्पवृक्ष नाशीती
पापा तापा दैन्या एकचि सत्संगती पुरेशी ती ॥ ११४

शब्दाचें बीज होईल तेथेंच तो टाकावा—

गीति.

जेथें सफल होइल वाचा तेथेंच बोलणें बरवें
स्थायीभावा धरुनी रंगाच्या, शुक्लपट जसा मिरवे ॥ ११५

प्रियकरानें केलेल्या खुणा पाहून—

शार्दूलविक्रीडित.

हुंगीतां कमला प्रियें, मुरडि ती हांसोनि पद्मानना,
लीलाकंदुकिं टोंचितां नख, करी सीत्कार झांकी स्तना,
लावी चंपकमाळ तो उरिं तदा रोमांचिता होउनी
मीलल्लोचनशी स्थिरावलि खरी दूरी प्रियापासुनी ॥ ११६

मन चिंतितें एक आणि दैव चिंतितें दुसरेंच—

शार्दूलविक्रीडित.

कान्तातें वदते कपोति भिउनी 'प्राणान्त वेळा अती
व्याधाचा शर चापिं सज्ज, फिरतो पक्ष्यारि हा भोंवतीं-'
तों डंखे पादिं सर्प बाण सुटला श्येनासि आली मृती
गेले ते निधनालयीं उभयतां 'दैवी विचित्रा गतिः' ॥ ११७

## ज्ञाते दोषाला लपवून गुण प्रकट करतात—

शिखरिणी.

गुणातें दोषातें बुध समचि दोहींस वरितो
शशीतें क्ष्वेडातें शिरिं गळिं जसे शंभु धरितो
गुणाच्या श्लाघेतें करुनि शिरसीं त्यास धरिती
मनामध्यें ज्ञाते गरलसम दोषा लपविती ॥ ११८

## वार्धक्यानें प्राप्त होणारें बाल्यत्व—

मालिनी.

वदनरादन गेले सोडुनी, शक्ति गेली,
वचन नुमटतें तें, तोंडिं लाळाच आली,
शिथिलतर बनूनी इंद्रियें लीन झालीं,
पुनरपिच जरेनें बाल्यता प्राप्त केली ॥ ११९

## शुकवाग्बंधन—

शार्दूलविक्रीडित.

रात्रीं दंपतिच्या वचा गृहशुकें ऐकीयले, तो तसें
थोरांसंनिध बोलतो बघुनियां स्त्रीनें फळाच्या मिषें
कर्णालंबितपद्मरागशकला चंचूपुटीं त्याचिया
वाग्बंधास्तव घातला जणुं कसा डाळिंब-दाण्यास त्या ॥ १२०

## असत्य वचन आणि सत्यवचन हीं कशीं असतात?—

गीति.

दुष्टाची शपथोक्ती पाण्यावरचींच अक्षरें असतीं
सज्जन-सहजा-भाषा शीलेवरचीं न अक्षरें पुसतीं ॥ १२१

## गुलाम कोण होतात व मालक कोण होतात?—

गीति.

धनतृष्णेचे सेवक होती जगतीं गुलाम लोकांचे
आशा दासी ज्यांची मालक ते होति हो गुलामांचे ॥ १२२

ज्याचें कर्म त्यानेंच करावें—

शार्दूलविक्रीडित.

नक्षत्रें बहु तीं नभांत जरि का पूर्णोदया पावतीं
तीं का शांतवितात दीर्घ तिमिरा का वार्धिरुज्जृंभितो ?
का ते आर्त चकोर पारणविधीं होतात संतुष्टसे ?
चंद्रा, श्लाघ्य तुझाच तो उदय रे तापापहारी असे ॥ १२३

ज्ञानोदय होईपर्यंत अज्ञान खुशाल बागडो—

शार्दूलविक्रीडित.

निद्रामीलितलोचनीं मृगपती यावत् गुहा सेवितो
तावत् स्वैर अशीं चरोत हरिणें, पावोत स्वच्छंद तो;
निद्रा त्यागुन बाह्यदेशिं विचरे जेव्हां मृगांचा पती
तन्नादश्रवणें विमूढ पृषरें दीर्घायु राहोत तीं ॥ १२४

सीतेनें रावणाला झिडकारल्यामुळें तो मदनपीडित होऊन विव्हळत पडला असतां त्याचे द्वारपाळ देवांना धमकावतात—

शार्दूलविक्रीडित.

ब्रह्म्या, अध्ययनास वेळ नच ही राहे उगा स्वस्थची,
थांबे बोल बृहस्पते जडमते ना ही सभा वज्रिची,
वीणा संहर नारदा, स्तुतिकथा थांबीव रे तुंबुरा,
सीताभल्लकभल्लभग्नहृदय स्वास्थ्या न लंकेश्वरा ॥ १२५

संवय स्वानुभवानेंच लागते किंवा सुटते—

अनुष्टुभ्.

प्रहारिलें विडाभातें । त्यजी तें नच आखुला
बांधिलें बहु सूर्खाला । त्यजीनाच तमाखुला ॥ १२६

योग्य दाता आणि सत्पात्र याचक यांची भेट झाली असतां

गीति.

दाता धनवान् असुनी याचक गुणवान् तसाच तो असल ।
संयोग तो तयांचा सद्बीजक्षेत्रसा पुरा बनला ॥ १२७

उत्तम वस्तूला दुसऱ्याच्या प्रशंसेची जरूर लागत नाहीं—

मंदाक्रांता.

वाणी आहे तशिच सरसा रंजयित्री म्हणोनी
श्रोत्यांनां ती विनति नलगे लेशही सावधानीं
सांजीं फुल्ला मधुयुत अशा नूतनशा मल्लिकांना
कांहीं नोहे कृतिस करण्या सक्त त्या षट्पदांनां ॥ १२८

थोरांना अंधेरांत राहणें जात्याच आवडत नाहीं—

रथोद्धता.

झांकिते मृगदृशी निजांचलें
स्वोरजद्वयगिरी करांगुलें
गौरवें प्रकटण्यास पाहती
उन्नतांस न सहे तिरस्कृती ॥ १२९

सूर्यग्रहणांत सूर्याची स्थिति कशी होते ती पाहा—

शार्दूलविक्रीडित.

ज्या लोकत्रयचक्षुचें पद शिरीं पृथ्वीभृतें वंदिलें
त्याला राहु क्षणार्धसा ग्रसि तरी आश्चर्य कोंदाटलें;
ज्योतिःकोट उठोनि रात्र फुलली, तारारुची फांकली,
घूक क्षुद्र अरी उठे, निकट ती ऐशी स्थिती जाहली ॥ १३०

लंपटतेंतील भ्रांति—

साकी.

संनिध मत्प्रिय येउनि जेव्हां करितो मधु वचनासी
न कळे माझें शरीर होतें कर्णचि कीं दृश मजसी ॥ १३१

अविवेकाची अखेरी पतनांतच होते—

गीति.

अन्योन्य मंडळाशीं अविवेकें पीडिती असे जे ते
कुच तें कुभूप यांची उन्नति झाली तरी पतन होतें ॥ १३२

'तूं' या शब्दाची महति—

श्लोक.

जनकीं सुतांची, सुरतीं स्त्रियांची
कवनीं कवींची, समरीं भटांची
'तूं' कार भाषा रसवर्धुनीया
रम्याच होते अधिका स्वकीया ॥ १३३

विद्या सर्वच शिकतात, पण तिचा खरा लाभ कितींना होतो?—

गीति.

वेश्यांसम मुखचुंबन विद्यांचें कोण नाहिं तें करितें ?
होती द्वि त्रि न होती त्यांमध्यें हृदयसार संहरिते ॥ १३४

भाट राजाच्या पराक्रमाचें वर्णन करतो—

गीति.

उद्दंड बाहुदंडीं कोदंड तुझें नृपा परिस्फुरतें
अरिमंडळ रविमंडळ रंभाकुचमंडळासि धांकवि तें ॥ १३५

थोर कुळांतल्या जन्माची बढाई व्यर्थ आहे—

शार्दूलविक्रीडित.

जन्म श्रेष्ठ कुळांत तो फुकट, ती कीर्ती पित्याची तशी,
सामर्थ्यें निज पावतो पुरुष तो मोठी प्रतिष्ठा अशी;
कुंभातें किमपीहि शक्ति नसतां शोषावया वापिला
हस्तीं घेउनि प्राशिलेंच मुनिनें कुंभोद्भवें अब्धिला ॥ १३६

पुढील चार गोष्टींच्या मुळांची चौकशी करण्यांत अर्थ नाहीं—

भुजंगप्रयात.

ऋषीचें नदीचें महात्म्या जनाचें
कुळाचें मुळाचें नये शोधुं साचें
स्त्रियेचे कृतीचे दुराचारणाचे
शिणाचें फुकाचें असें शोधण्याचें ॥ १३७

[stamp]

एक विरही म्हणतो—

पृथ्वी.

जरि स्मरणिं राहिली ममजिवप्रियापुत्तली
तरी न मज आस ती सजिव राहण्या राहिली;
जरि स्मरण सोडुनी सजिव राहिलों मी तरी
कशास जगणें तसें निवळ भारसें भूवरी ॥ १३८

ज्येष्ठत्व श्रेष्ठत्वांतच असतें—

इंद्रवज्रा.

ज्येष्ठत्व ज्येष्ठास नसेंच कोठें
ज्येष्ठत्व श्रेष्ठासि असेंच मोठें;
पानें बहू तीं जरि केतकीला
साना मिळे त्या बहु गौरवाला ॥ १३९

मूर्ति तितक्या प्रकृति—

अनुष्टुभ्.

पिंडीं पिंडीं मती भिन्ना। कुंडीं कुंडीं नवीं पयें
जातीं जातीं नवाचार। नवा वाणी मुखीं मुखीं ॥ १४०

डांस आणि खल यांचें सादृश्य—

वसन्ततिलका.

प्राक् पायिं तो पडुनि खायि च पृष्ठमांसा
कर्णी विचित्र करितो रुदना हळूंसा
छिद्रा बघूनि सहसा शिरतो तयीं तो
ऐसेंच डांस खलसदृश हें करीतो ॥ १४१

थोर व मूर्ख यांच्या पतनांतला फरक—

गीति.

थोर असा जरि पडला, पडतो तो चेंडुसाच भूवरती
पूर्ण असा तो पडतो मृत्पिंडासम सदैव मूर्खमती ॥ १४२

**एक कामी एका निराश्रिता तरुणीला म्हणतो—**

गीति.

विद्रुमछाया दिसतो मरुमार्गासम तुझा मला अधर
बाले, कोणा न करिल पानाविषयीं मनास हा अधिर?॥१४३

**धनाचे चौघे समभागी दायाद कोणचे?—**

वसन्ततिलका.

धर्माग्निभूपवरतस्कर चार ऐसे
दायाद वित्ति असती समभागि तैसे:
ज्येष्ठावमान करिता बहु कोपताती
तीन्ही कनिष्ठ मग ते धन लोपवीती॥ १४४

**दुरून कीर्ति ऐकली म्हणून डोळ्यांचें पारणें फेडायला आलों—**

वसन्ततिलका.

लांबूनि ऐकुनि तदीय सुकीर्ति झाले
कर्णप्रदेश मम तुष्ट, परी न धाले
चक्षू मदीय, म्हणुनी तव दर्शनाला
आलों तदीय कलहा क्षणिं सारण्याला॥ १४५

**पुढील सात वस्तु फारच सुंदर दिसतात—**

शार्दूलविक्रीडित.

शाणोल्लीढ मणी, रणीं विजयि जो घायाळ, हत्ती जसा,
क्षीणस्रोत, शरदुसुश्यामपुलिनीं नद्यौघ तोही तसा
शेषश्चंद्र, गलीतशी नव वधू संभोगभोगानना
हीं सारीं रमणीय भूपहि तसा दत्तार्थ तो अर्थिनां॥ १४६

**वरातमागून तट्टू कशाला?—**

इन्द्रवज्रा.

दीपान्त झाल्यावरि तेल काय?
गेल्यावरी चोर हकाटि काय?
वृद्धासि भामासुविलास काय?
स्रोतावसानीं मग सेतु काय?॥ १४७

**शिवविष्णूंचें श्लेषवर्णन—**

उपजाति.

गवीशपत्री नगजापहारी। कुमारकर्ता शशिखंडमौली
लंकेशसंपूजितपादपद्मी। पायादनादी जगतास वाली॥ १४८

**याहून अधिक दुर्दैव तें कोणचें?—**

गीति.

जन्मा येतां मेली माता, नवयौवनीं तशी भार्या,
वार्धक्यीं सुत मेळा, पातक परतें महान् कवण आर्या? १४९

**रंगानें एकच पण गुणानें भिन्न हें उचित समयींच कळतें—**

गीति.

पिककाक कृष्ण असती दोघेही सारखेच वर्णी ते
येतां वसंत मग ते 'काकःकाकः पिकःपिकः' ठरतें॥ १५०

**कोणी परान्नप्रिय भट्ट आपल्या पुत्रास उपदेश करतो—**

गीति.

झाली परान्नप्राप्ती लोभा सोडी स्वकीय प्राणाचा
दुर्लभ परान्न लोकीं, जन्मोजन्मींच प्राण येयाचा॥ १५१

**पुढील तीन गोष्टी आहेत म्हणून जग सुरक्षित आहे—**

गीति.

शार्दूल आळशी तो, भ्याड तसा उरग तोहि साच असे
पिशुनीं दरिद्रता ती, म्हणुनी रक्षित जगत् सदा विलसे॥ १५२

**सारेंच मला हवें असें म्हणूं नये—**

शालिनी.

ध्यावें देवा केशवा वा शिवाला
स्नेही घ्यावा भूपती वा यतीला
वासा पावा पत्तना वा वनाला
ल्यावी भार्या सुंदरी वा दरीला॥ १५३

दुष्ट संगति सुष्टाला बाधत नाहीं—

गीति.

साधु न पावति विकृति, केली संगति तयासि दुष्टांनीं
चंदन विषारि नच हो, वेष्टित जरि तो महाभुजंगांनीं ॥ १५४

प्रियानें धाडून दिलेल्या अंगठींतल्या खड्याकडे टक लावून बघत बसण्याचें कारण एक विरहिणी आपल्या सखीस सांगते—

शार्दूलविक्रीडित.

साक्षी हा कुचमर्दनीं परिणयापासूनि प्रीतींतला
मुद्रांकीं रतिनाथलेखनिं तसा, चूतीं पणीं योजिला
अंतःशून्य सखे सुमूर्त हृद हें माझ्याकडे धाडिलें
चक्षुर्मंगल अंगुठीमणिस या पाहात मी राहिलें ॥ १५५

माकडाला माणकाची किंमत काय?—

शार्दूलविक्रीडित.

हुंगीलें तुज चुंबिलें वरिवरी चाटूनि चावूनियां
जाणेना खरि योग्यता तरि दिलें रागेंच फेंकूनिया
नाहीं पाहियलें चुरूनि दगडें पोटा तुझ्या वानरें
माणिक्या, समजें बरेंच तव तें प्रारब्ध कीं थोर रे॥ १५६

स्तुतिरूप कन्या अविवाहिता कां राहिली आहे?—

शार्दूलविक्रीडित.

अद्यापि स्तुति कन्यका जगतिं या राहे कुमारी अशी
तीतें मागति जे असत् नर तयां धिःकारिते ती तशी
तीतें सत् रुचती तयां नच रुचे ती सुंदराकंधरा
कल्पांतावरि हें असेंच घडणें आहे खरें हें स्मरा ॥ १५७

खलांची कृति व तिच्या उलट कृति—

इंद्रवज्रा.

विद्या विवादा धन तें मदाला। शक्ती पराला बहु पीडण्याला
क्षुद्राकृती, संमुख ती इयेला। ज्ञानास,दानास च रक्षण्याला ॥१५८

रोगाची बाह्यशांति करण्यापेक्षां त्याला मुळांतूनच नष्ट केलेला बरा—

मंदाक्रान्ता.

अज्ञानी ते सतत करिती देहशांती तपानें,
ज्ञाते जे ते शमवुनि तसे विकृतीमूळ त्यानें;
कुत्रे क्रोधें चघळिल शरा सोडुनी हेतुबाधा,
तैशी नाहीं मृगपति कृती, ठार मारील व्याधा ॥ १५९

मधुर भाषण आणि कठोर भाषण—

शालिनी.

वाङ्माधुर्या लोकिं मोठी प्रशस्ती
वाक्पारुष्या तैशि कांहींच नास्ती;
देतो कोणा कोकिळ द्रव्य कांहीं ?
तैसा कोणा रासभ-त्रास नाहीं ॥ १६०

साधुसंगति कोणच्याहि स्थिति-अवस्थेंत उत्तमच—

गीति.

खलसख्य प्रथम मधुर, अंतरिं वय तें, निदाघदिन अंतीं;
मूलीं, मध्यें, अंतीं, एका सुखदाच साधुसंगति ती ॥ १६१

कांहीं गांवढळ हत्तीला पाहून—

शार्दूलविक्रीडित.

ऊर्णाप्राप्ति न, दुग्धही न च मिळे, हा वाहना योग्य ना,
तृप्ती यास न हो, महोदर बहू घासी पलालीं म्हणा;
हा देवा चढवावया युगत कें पाठीवरी गोणि ती
नाहीं मूल्य च या कपर्दिकहि तें, ग्रामिन् गजा हांसती॥ १६२

बेडूक वक्ते झाल्यावर कोकिळांनीं मौन धरावें हेंच उत्तम—

गीति.

कोकिळ धरिती मौना जलदागमिं चांग चांग ते करिती,
बेडुक वक्ते होती तेथें मौनत्व हेंच योग्य अती ॥ १६३

**याचकाचा ब्रह्मदेवावर आरोप--**

शार्दूलविक्रीडित.

धात्या, याचकवृंदिंचा असासि तूं वैरी असें वाटतें
कां तूं विक्रमशालिवाहनमहीभृन्मुंजभोजांसि ते
केलें नाहिं चिरंजिव प्रकृतिचे जे विश्वपाळी असे ?
मार्कंडिध्रुवलोमशादिक अशां दीर्घायु केलें कसें ? ॥ १६४

**साधु किंवा असाधु हे प्रकृतीनेंच असतात—**

शिखरिणी.

असाधू साधू कीं असति प्रकृतीनेंच जगतीं
न होई संगानें किमपि कुमती कीं सुमति ती
मणी सर्पाच्या तो शिरसिं प्रकृतीनेंच असतो
परी शीलीं त्याच्या तिळ न मुळिं तो भेद पडतो ॥ १६५

**सरस्वतीचें अपूर्व भांडार—**

अनुष्टुभ्.

अपूर्व कोष तूझा गे । जगतीं देवि भारति
व्यय केल्या वृद्धि होते । संचयें क्षीण तद्गति ॥ १६६

**पात्रतेवांचून महत्व मिळत नाहीं—**

शार्दूलविक्रीडित.

लोकीं राहति अप्रसिद्ध जन ते यावत् तयांतें नसे
शक्ती मेळविण्या महत्त्व, कृति ही ज्ञात्यांत मोठी वसे;
सर्वानंदकरा पिकास न च ये वाणी मधूरा अशी
मौनत्वा वरुनीच वेळ ढकली तावत् वनीं तो तशी ॥१६७

**रुक्मिणीच्या महालांतून आलेल्या कृष्णाला भामा म्हणते—**

मालिनी.

स्खलन बहु तुझ्या त्या बोलण्यामाजिं होतें
वदसि अडखळूनी त्यावरूनीच मी तें
समजुनि मनिं गेल्यें, ओष्ठमद्या पिऊनी
सवतिरति मुकुंदा येसि येथें करूनी ॥ १६८

संगमापेक्षां विरहच बरा! कारण—

गीति.

संगमविरहांपैकीं विरह मला सत्य तो बरा गमतो
संगीं एके ठायीं, विरहीं सर्वत्र मी तिला बघतों ॥ १६९

प्रेमबंधनापुढें इतर बंधनें तुच्छ आहेत—

स्वागता.

बंधनें बहु जरी असलीं तीं
प्रेमबंधन तयीं दृढकांतीं
दारुभेदनिपुण भ्रमराचें
पद्मकोषे करि बंधन साचें ॥ १७०

डावा हात हा सर्वस्वीं स्तुत्य आहे पण एका गोष्टींत अपवित्र असतो—

शार्दूलविक्रीडित.

एक कवि—शत्रूचें शिर तें धरी वरि तसा अश्वास हा आवरी
घेई चर्मधनूंस चाल करुनी जाई रणाभीतरीं
द्यूतीं चौर्यकथीं तसाच शपथीं हा वाम बाहू नसे
दु.कवि-दाना योग्य न हा म्हणूनि विधि या शौचास योजीतसे ॥ १७१

पोराचे पाय पाळण्यांतच दिसतात—

द्रुतविलंबित.

उपजतां नच दुग्धहि प्राशिलें
हरिकिशोरवरें, परि फेंकिले
नयनजाल निकुंजिं गजांचिया
कृति अशा बहु थोर जनांचिया ॥ १७२

श्रीमंतानें कांहीं केलें तरी तो पूज्यच ठरतो—

शार्दूलविक्रीडित.

कर्मे पाशावि तीं करो, फसवुनी धार्मीक नाडो तसा,
मारो आइस, मद्यपानहि करो, टाको वधूला कसा,
निंदो वेद, जनांसि मारुनि करो कांहींहि तो स्वैरसा,
लक्ष्मीवास जया गृहीं, भजति त्या कीं हो जगत्पूज्यसा ॥ १७३

**बेकीची एकी करणारा धन्वी—**

साकी.

एक वस्तुला द्विधा कराया धन्वी बहुताचे असती
मोडुनि द्वैता ऐक्य कराया कामधन्विसम नसती ॥ १७४

**रतिसंगरोदयवर्णन —**

गीति.

तृप्ता मत्ता हृष्टा पाहुनि सखिला प्रसन्न मी झालों
प्रल्हन्न प्रमुदितसा रतिसंगरिं मारसाच कीं शिरलों ॥ १७५

**हा संसार मोठा विचित्र आहे—**

स्रग्धरा.

कोठें वीणा निनादे, रुदनरव शिरे कर्णी तैसाच कोठें,
कोठें विद्वत्कथा त्या, कलहचि मदिरापानमत्तांत कोठें,
कोठें रम्या स्त्रिया त्या, गलितवपु अशा योषिता त्याहि कोठें,
संसारा अमृतीं कां गरलिंच भरलें गूढ हें फार मोठें ॥ १७६

**शृंगाराचा एक प्रकार—**

गीति.

आर्द्रा क्लिन्ना स्तिमिता सौधावरि चांदण्यांत ज्या मिळते
सौभाग्यें स्वभुजांतरिं सुंदरि त्याचें सुदैव फळफळतें ॥ १७७

**शेरास सवाशेर—**

गीति.

खद्योत चमकती ते जोंवरि नाहीं नभीं शशि उदेला
उदया ये रवि तेव्हां चंद्र न खद्योत-ठाव तो उरला ॥ १७८

**औदासिन्य आणि प्रेमा यांच्यांतली शर्यत—**

गीति.

तव तें औदासिन्य प्रेमा माझा च स्पर्धती दोन्ही
वाढति, नकळे यांतुनि होइल जित सुंदरी असा कोण्ही ॥ १७९

नाजुक शृंगाराचा एक प्रकार—

पृथ्वी.

न ने सामिप नासिका परिमलव्ययां भीउनी,
भयें विरहवन्हिच्या हृदिं धरी न त्यालागुनी,
दिसेल नयनीं न तें म्हणुनि कर्णि ठेवीच ना,
करींच कमला धरी नयनरश्मिनां प्राशना ॥ १८०

गुणज्ञाता अल्पदाता असला तरी गुणीजनाला बरें वाटतें—

शिखरिणी.

गुणाचा अज्ञाता प्रचुर धनदाता सुख न तें
गुणज्ञाता भेटे सुखद मितदातृत्व गमतें;
जरी ग्राम्या पाही चतुर बघतो ना तिजकडे
पुरस्त्री दृक्क्षेपें शरहत असा होउनि पडे ॥ १८१

प्रत्येकाचें पाहाणें निराळें—

शार्दूलविक्रीडित.

कन्या इच्छि वरा सुरूप अवघा, माता धनीकाप्रती,
ज्ञानी आवडतो पित्यास, तर तो आप्तां कुलीना कृती
अन्यां मिष्टपदार्थप्राप्तिपुरती राहे सदा लक्षणा,
भट्टां आवड ती कशांतहि नसे व्हावी तयां दक्षिणा॥ १८२

विद्वानाला ब्रह्मदेव दरिद्रता कन्येचें दान कसें देतो?—

गीति.

सत्कुल, विद्या, शील, स्वरुप तसें शौर्य यां परीक्षोनी
कन्या देती, सम दे ब्रह्मा निपुणा दरिद्रता दानीं ॥ १८३

गुणविजयान्योक्ति—

गीति.

कूपाच्या खोलींतुनि बहुगुण लागे जलासि काढाया
पात्रानुमानदानें त्याचा लागे विवेक वाढाया ॥ १८४

**नकुलाची अश्वविद्या—**

दिंडी.

नकुळ वाजीच्या रंगणास घेई
मंडळीं तो मंडळाकार होई
सरळ रेखा ती अश्वमयी भासे
सव्य दक्षिण घे तदा द्विमुखि तैसें ॥ १८५

**एक कवि राजाला खुबीनें आशीर्वाद देतो—**

द्रुतविलंबित.

कमलभूतनया वदनांबुजीं
कमलजा सम ती करपंकजीं
कमलसारज तो वपुषांतरीं
वसुनि, विष्णु वसो हृदयांतरीं ॥ १८६

**नव्या नवरीची वागणूक—**

उपेन्द्रवज्रा.

असंमुखालोकन तेंच कान्ता
निषेध ती संमति होय शान्ता
अवाच्य प्रत्युत्तर तेंच माना
नवांगनारीति अशा नवीना ॥ १८७

**सुपें कोण व चाळण्या कोण?—**

गीति.

शूर्पासम दोषांतें टाकुनि गुण घेति थोर ते ज्ञाते
चालणिसम गुण टाकुनि दोषा स्वीकारितात दुर्जन ते॥ १८८

**तपश्चर्येंत ज्ञानाचें प्राधान्य असतें—**

शार्दूलविक्रीडित.

स्नाना मीन करी, फणी पवनभुक्, पर्णाशनी मेष तो,
राही चातक निर्जळ प्रतिदिनीं, आखु बिळीं राहतो,
भस्में गर्दभ नाहतो, बक उभा ध्यानस्थ राही परी
ते हो मोक्षपदीं न जाति; तपनीं प्राधान्य ज्ञानांतरीं ॥ १८९

मदनाची धनुर्विद्या अलौकिक खरीच—

दिंडी.

धनुर्विद्या ती मदनमहात्म्याची
अद्वितीया राहिली जगीं साची
वपुसि अक्षत ठेवुनी कुशलतेनें
विंधितो मन अचुकसें शरार्णानें ॥ १९०

कृपण आणि कृपाण यांच्या मुठींचें भेदवर्णन—

गीति.

दृढतर मुष्टी असते कृपणाची ती तशी कृपाणाची
कोशस्थ मलिन दोघे 'आ'कारीं भेद अक्षरीं वाची ॥ १९१

कथापुराणश्रवणसमयीं श्रोत्यांना झोंप येते, तिची थट्टा—

दिंडी.

कुंभकर्णाची प्रिया झोंप होती
रामचंद्रें मारिलें तिये हातीं
त्यामुळें ती वैधव्य पावुनीयां
ऐकण्यासी ये कथापुराणीं या ॥ १९२

सज्जनमनस्वभाव—

गीति.

उपकार, प्रियभाषण, निर्व्याजा मैत्रि हा स्वभाव असे
सज्जन पुरुषांचा, त्या चंद्रा करि कोण थंड? हें हि तसें ॥ १९३

कोणी एक स्त्री आपल्या पतीच्या प्रथम भेटीपासून गट्टी जमेपर्यंतचें वर्णन आपल्या मैत्रिणीला विशद करून सांगते—

पृथ्वी.

कृतान्तसम कान्त तो प्रथम भेटिला वाटला,
दुज्याच महिन्यामधें मनुजसा मला भासला,
पुढें ममाचि प्राणसा तशिच मी तदीय प्रिया
क्रमेंचि भुवनत्रयीं नयनिं राहिला माझिया ॥ १९४

धनिक आणि ज्वरिक यांचें साम्यवर्णन—

अनुष्टुभ्.

भक्तीं द्वेष, जडीं प्रीती, । अरुचिर्गुरुलंघनीं
मुखीं कटुकता नित्य, । धनिका ज्वरिका जनीं ॥ १९५

मूर्ख शहाणा केव्हां ठरतो!—

शार्दूलविक्रीडित.

शून्यात्मे सगळे, धुरीण अवघा साचा असे तो तरी
होतीं तत्प्रभवें समूल्य सगळे त्याच्याच कार्यांतरीं;
अंकानें महती मिळे गणितिं त्या शून्यास तैसेंच हें
जाणावें, उपमा दुजी तरि कशा खोटें असें हें नव्हे ॥ १९६

गुणराशीनें दोषाचा नाश होतो—

उपजाति.

अनंत रत्नें प्रसवी असा तो
हिमें न सौभाग्यविलोपि होतो;
गुणौघिं दोष प्रविलीन साचा
चंद्रप्रभीं अंक जसा तयाचा ॥ १९७

दोषानें गुणराशिनाश होतो—

उपजाति.

'गुणौघिं दोष प्रविलीन साचा
चंद्रप्रभीं अंक' अशा वचाचा
कवी असूनी दिसलें न त्याला
दारिद्र्य नाशी गुणराशिमाला ॥ १९८

शूर, पंडित, वक्ता आणि दाता यांचें कोष्टक—

अनुष्टुभ्.

शतीं असे एक शूर, । सहस्रीं एक पंडित
वक्ता दशसहस्रांत, । दात्याची जागे वा न वा ॥ १९९

विश्वव्यापक विष्णुपदापेक्षां भक्तहृदय केवढें मोठें असतें?—
पाहा—

शार्दूलविक्रीडित.

विस्तीर्णा पृथिवी महत्तुमहती, वेढी तिला सिंधु तो
प्याला त्यास मुनी अगस्त्य गगनीं खद्योतवत् भासतो
नाहीं विष्णुपदास तेंहि पुरलें व्यापावया पूर्णसें
ऐसा विष्णु जया हृदंतरिं वसे तो केवढा हो असे?॥ २००

एका मधुरश्रृंगाराचें वर्णन—

शार्दूलविक्रीडित.

एक्या आसनिं बैसल्या प्रियतमा पाहूनि मागूनिया
जाऊनी नयनां विनोद करण्या झांकी च एकीचिया
अंतर्हासलसत्कपोलफलकीं धूर्तें दुजी चुंबिली
प्रेमोल्लासमना, तयें सपुलकावस्थेंत जी पाहिली॥ २०१

नौका आणि चहाडाची जीभ यांचें श्लेषवर्णन—

गीति.

नौदुर्जनाजिव्हांची प्रतिकूला ती विसर्पिणी गमते
इतर प्रतारणार्थी निर्मितविधि साच दारुणा दिसते॥ २०२

कोकिळाला विनंतीची अन्योक्ति—

शार्दूलविक्रीडित.

रे रे कोकिळ, सोडि मौन विनया सारूनि त्या बाजुला
किंचिदुच्च अशा सुपंचमरवा काढी, स्वतांच्या कुला
जाणाया जगतास आम्रविटपीं काकौघि प्रार्थी तुला
तूझें त्यांत तसें जगद्धित असें जाणीच या हेतुला॥ २०३

सन्मित्रकृति—

गीति.

कर जैसे शरिराचे किंवा पक्ष्मणि विलोचना साच्या
अप्रोक्तकार्यकारी, कृति या ऐशाच कीं सुमित्रांच्या॥ २०४

### आशायाः परमं दुःखम्—

वसन्ततिलका.

जाईल रात्र मग येइ पहाट जेव्हां
होईल रव्युदय पद्म हंसेल तेव्हां
कोशस्थ भृंग मनिं चिंति अशा तऱ्हेनें
संधीस त्या नलिनिला खुडिलें गजानें ॥ २०५

### हातांत आहे तोंपर्यंत सत्पात्रीं दान करावें—

शार्दूलविक्रीडित.

मेघा गर्जुनि तोय अर्पिशि न कां सांगे मला हेतुला
मी हा व्याकुळ चातक प्रकटशी पृच्छा असे ही तुला
दैवें दक्षिण वात तो जरि सुटे कोठें तुझी ती गती?
कोठें मी? जलपात तो तव घडे कोठें? वदे मत्प्रती ॥ २०६

### मदनाव्हानभास—

शिखरिणी.

स्वभारें तोषीती रमणफलकां पुष्ट कुच ते
परी त्या योगानें पदयुगल तें त्रस्त दिसतें
कटीकिंकीणीच्यासम रव करी नूपुर पदीं
जणूं कीं आव्हाना करि मदनभूपास सपदीं ॥ २०७

### वियुतजनमनाला चंद्रप्रकाश कसा भासला?—

मालिनी.

मलयजरस किंवा मारकंदार्क व्यापी
अखिल धरणि वाटे, सत्य नाहीं तथापी
शशिकरनिकरांचा ओघ हा येथ आला
वियुत-जन-मनाला हांसुनी टोंचि भाला ॥ २०८

### शब्दलालित्यानें हरिणाक्षीच्या नेत्रांचें वर्णन—

गीति.

मलिनाभ्यंतरिचे, उद्युक्त श्रुतिलंघनाक, अधिर असे
लोचन हरिणाक्षीचे स्मृतिलोपकृती जयांत शोभतसे ॥ २०९

## शुद्धहृदयमहिमा—

शार्दूलविक्रीडित.

शूली मार परस्परांस अरि ते आहे प्रसिद्धी अशी
दोघांचा परि तूं प्रणाय्य असशीं, मैत्री तुझी ती तशी
चंद्रा, शुद्धपणा तुझ्या हृदिं वसे स्वाभाविकें सत्य जो
त्याचा हा महिमा असे, जग तशा ध्याया धज्यातें धजो ॥ २१०

## स्वाभाविक गुणविस्तार—

शार्दूलविक्रीडित.

वार्ता अद्भुत कौतुकास्पद तशी, शुद्धाच विद्यासती
नाभीचा मदगंध साच तिसरा लोकोत्तरा तद्वती
नीराभ्यंतरिं तैलबिंदु पडतां स्वाभाविकें विस्तरे
तैशी ही त्रयि दुर्निवार पसरे लोकीं क्षणीं तत्परें ॥ २११

## मावळत असलेल्या सूर्याला पाहून—

वृत्तवैचित्र्य.

राजा—अंशुमालि पडला जलराशीं
बाण—मत्तभृंग सरसीरुहकोशीं
महेश्वर—खग शिरे विपिनद्रुमकोटरीं
कालिदास—मदन मंदगती ललनांतरीं ॥ २१२

## संपत्ति आणि विपत्ति ह्या कोणाला शोभतात ?—

अनुष्टुभ्.

आपदा महता दोन्ही । महतांनाच शोभती
क्षयवृद्धी चंद्र पावे । तारका न च पावती ॥ २१३

## पुढील तीन गोष्टी शोभाहीन असतात—

गीति.

रजनिकराविण रजनी, नीरजनिकरें रितें सरोवर ती
शोभागत नवरसभा नवरसभावज्ञवर्जिता गमती ॥ २१४

कादंबरींतील शुक राजाची व्यर्थी स्तुति करतो—

दिंडी.

शत्रुकामिनिकुचयुग स्नात ऐसे
हृदयशोकाग्नीनिकट सिद्ध जैसे
होउनीयां विमुक्ताहार तैसे
व्रती बसले दीसती स्पष्ट कैसे ॥ २१५

प्रिय लतेवर अन्योक्ति—

दिंडी

तुला साधारण जाणुनी लता ती
आलवाला रचियलें न क्यां हातीं
वास सदनीं घमघमे चंपके तो
त्वदिय सुमनाचा मला लाजवीतो ॥ २१६

भामाविलास—

मालिनी.

विकसनगत अब्जा त्वन्मरंदस्रवातें
पिउनि अलि करूं रे मंजुगुंजारवातें
दिशिं दिशिं पसरो त्वद्गंध निर्लोभ ऐसा
समिर तरि तुझा तो बंधु आहेच तैसा ॥ २१७

विभावनालंकार—

गीति.

राजा प्रतापरवि तव दावी मोठ्या अशा चमत्कृतिला
देसि न अनातपत्रा ताप जसा सातपत्रशत्रूला ॥ २१८

सद्वंशज खल आणि धनुष्य यांच्या गुणलाभाचा शेवट एकच होतो !—

गीति.

सद्वंशज जरि असले खल धनु गुणलाभ त्यांसि जरि झाला
शेवट त्यांचा होतो पडण्यानें हो दुज्या हृदीं घाला ॥ २१९

विरहिणी स्त्री उगवत्या चंद्रास पाहून म्हणते—

शार्दूलविक्रीडित.

संध्या ही, रवि हा नसे, शशि न हा चंडद्युतीचा असा
दावाग्नी? न च भूवरी! अशनि हा? स्वच्छांबरीं तो कसा?
आलें ध्यानिं खरेंच! पांथरमणिप्राणानिलासेवना
येई सर्पिणि रात्र, हा शिरमणी तीचाच ही भावना॥ २२०

२३५४

कोणी विरहिणी मदनाला उद्देशून म्हणते —

शिखरिणी.

जटा नाहीं वेणी शिरिं रचिलि आहे, विष न हे
गळीं कस्तूरी ही, शिरिं न शशिरेखा सुमन हें
न ही भूती अंगीं विरहासित हा देह बनला
पुरारि भ्रांतीनें कुसुमशर कां मारिसि मला?॥ २२१

मनुष्याला योगी अथवा पशु कसा समजावा—

इंद्रवज्रा

ज्याला नसे प्रेम सुभाषितीं तें
रंगे न जो मोदतींल गीत
लीले स्त्रियांच्या नच मत्त होतो
तो मुक्तयोगी अथवा पशू तो॥ २२२

विद्वत्ता भडकीच्या पोषाखावर नसते—

अनुष्टुभ्.

अक्षरास परीक्षावें। अंबराडंबरीं न तें
शंभु नग्न जरी राहे। सर्वज्ञत्व न लोपलें॥ २२३

धनवृद्धाचे सेवक—

अनुष्टुभ्.

वयोवृद्ध तपोवृद्ध। ज्ञानवृद्ध बहुश्रुत
ते सर्व धनवृद्धाच्या। द्वारीं किंकर तिष्ठत॥ २२४

**पंढरीचा विठोबा कमरेवर हात देऊन उभा असण्याचें कारण—**

शार्दूलविक्रीडित.

पार्थस्यंदनवाजिरश्मि धरुनी, गोवर्धना पेलुनी,
गोपींचे कुच मर्दुनी, मुरलिका ठेवूनि ओष्ठासनीं,
गाईंचें पय काढुनी, उखळिच्या बंधाप्रती सोडुनी
कष्टी विठ्ठल, पाणि ते कटितटीं राहे उभा ठेवुनी ॥ २२५

**पंपासरोवराच्या तीरावरील बगळ्याला पाहून—**

शार्दूलविक्रीडित.

राम—पाही लक्ष्मण त्या बका परम तो धार्मीकसा वाटतो
प्राणीघात न हो म्हणूनि हलकें पाऊल तो टाकितो

**रामाचे हे उद्गार ऐकून पंपासरोवरस्थ मासा रामाला म्हणतो-**

मासा—शेजारी कथिती स्वभावरचना तत्साहचर्यामुळें
रामा, वर्णिसि त्या बकें रगडिलीं भक्ष्यार्थ माझीं कुळें ॥ २२६

**सज्जनपुरुषवर्णन—**

दिंडी.

वदन ज्याचें सदन तें प्रसादाचें
सदयहृदयीं, शब्द ते मुखिं सुधेचे
अन्यकारणिं झिजतसे देह ज्याचा
वंद्य कोणा न च होय पुरुष साचा ॥ २२७

**ज्या मनांत मेरूलाही जिंकणाऱ्या विशालस्तनी युवती आहेत तें मन अणुमात्र कसें असेल ?—**

दिंडी.

चित्त आहे परमाणुमात्र ऐसें
वदति तार्किक त्यां लाज हें न कैसें ?
कनकपर्वत जिंकिती स्वस्तनीं त्या
संनिवशति त्यामधें युवति जात्या ॥ २२८

विक्रमसभेंत जाऊन एक कवि म्हणतो—

दिंडी.

सर्वकाळीं सर्वांस सर्व देशीं
कविस्तुति ही मिथ्याच तुझी ऐशी
अरिसि पृष्ठी लाभली तुझी नाहीं।
वक्ष तैसें परकीय रमणिलाही ॥ २२९

श्लेषयुक्त द्व्यर्थी राजस्तुति—

दिंडी.

धनुर्विद्या शिकलासि अपूर्वा ही
कोण गुरुजी केलास गुणग्राही ?
मार्गणांचा तुजकडे ओघ येतो
मागुती तो गुण दिगंतरीं जातो ॥ २३०

राजकीर्तीचें एक चमत्कारिक वर्णन—

उपजाति.

सरस्वती कंठिं तुझ्या वसोनी
लक्ष्मी करीं राहतसे म्हणोनी
सापत्नभावें तव कीर्ति गेली
देशांतरीं क्रोध भरोनि गाली ॥ २३१

तेजस्वी जनांची वृत्ति कशी असते?—

शालिनी.

इध्मप्रेंखें अग्नि तो पेट घेतो। आस्फोटानें नाग काढी फणा तो
तेजस्वी जे राग येतां तयां ते। अंतस्तेजा दाविती तत्क्षणातें॥ २३२

खलस्वभावकथन—

गीति.

परवादीं दशवदनी, परंध्रनिरीक्षणीं सहस्राक्षी
सद्वृत्तवृत्तिहरणीं बाहुसहस्रार्जुना खला लक्षी॥ २३३

कोणी याचक धनतृष्णेनें झालेली आपली विटंबना गर्भितार्थी रामचरित्रांत वर्णितो—

शिखरिणी

जनस्थानीं धांवें कनकमृगतृष्णाकुल असा
वचें मी वैदेही सतत प्रलपीं अश्रुयुतसा
कृतालंकाभर्तुर्वदन परिपाटीस रचिल्या
मयार्थी रामत्वीं कुशलवसुता नाहिं मिळल्या ॥ २३४

खरें सामर्थ्य प्रकृतितत्त्वांत असतें! उपकरणांत नसतें!—

शार्दूलविक्रीडित.

पुष्पाचें धनु, मित्र हैमकर तो तैसा जडात्मा अती
योषाचंचलनेत्रकोणशर ते, मौर्वी सुभृंगावती
स्वांगें नांगि असोनि व्याकुळ करी साऱ्या जगा भूपते
सत्त्वश्रेष्ठक्रियेंत नोपकरणीं सिद्धी खरी लाभते ॥ २३५

वरील तात्पर्याचाच दुसरा श्लोक—

शार्दूलविक्रीडित.

घोडे सात, द्विरश्मिपन्नग तसे, सारथ्य व्यंगांगिला
एकश्चक्र रथा, पथिन् अधरसा लंघावया भानुला
जातो रोज अपार अंबर तरी उल्लंघुनी सूर्य तें
सत्त्वश्रेष्ठक्रियेंत नोपकरणीं सिद्धी खरी लाभते ॥ २३६

सरस्वतीला नमन करण्याचें कारण –

गीति

मतिहेमाचा कळवी एका वचनें क्षणांत कस केंवीं
प्राज्ञेतरसा, म्हणुनी नमन असो त्या सरस्वतीदेवी ॥ २३७

पुढील तीन प्रसंगीं कोणाच्या छातींत धडधडत नाहीं!—

अनुष्टुभ्.

विद्वज्जनसभेमध्यें । नारीप्रथमसंगमीं
रणीं रिपु पुढें येतां । कोण कातर होइना? ॥ २३८

भाषाविनोद—

दिंडी.

मना जाणुनियां तृतिय प्रकृतीचें
प्रियेपाशां धाडिलें तया साचें
जाउनी तें रममाण तेथ झालें
पाणिनीनें प्रजासि हां ठकवियेलें ॥ २३९

साह्यकर्ते थोर गुणदोष पाहात नाहींत—

वसंततिलका.

तो दोषि तो कुटिल तो सम तो कलंकी
मित्रावसानसमयीं उदयस्थ लोकीं
तो चंद्र मस्तकिं शिवप्रियसा विलोकी ।
साह्यांत थोर गुणदोष न पाहती कीं ॥ २४०

गर्भितार्थसूचक अन्योक्ति—

वसंततिलका.

तापोष्णतप्तगिरिनां बहु शांतवोनी
दावाग्निदग्ध-विपिनां सम तोषवोनी
नानानदीनदशतां जलपूर्ण केलें
तूं रिक्त, भूषण तुला घन, होंचि झालें ॥ २४१

केव्हांहि योजकच चांगला लागतो—

उपजाति.

अमंत्र तें अक्षर नाहिं ऐसें
जाग्रु प्रतीमूळिं वसेंच तैसें
अयोग्य तो पुरुष नाहिं ऐसा
त्यां पाहिजे योजक मात्र तैसा ॥ २४२

कविता आणि वनिता यांना बलात्कार सोसत नाहीं—

साकी.

कविता वनिता स्वयें येति त्या, प्रेमोत्सव करिताती
बलात्कार तो त्यांवरि केला, सरसा विरसा होती ॥ २४३

एका पतिविरहिणीला तिची सखी विचारते—

शार्दूलविक्रीडित

आहारा त्यजुनी, समस्तविषयग्रासीं निवृत्ता तशी
नासाग्रीं वळवूनि दृष्टि बसशी, एकाग्रचित्ता अशी
मौनत्वा धरिशी, तुला गमत ही शून्याच सृष्टी तरी
सांगे, योगिनि, कीं वियोगिनि, सखे झालीस तूं अंतरीं?॥२४४

पाठीवर रुळणाऱ्या वेणीवर उत्प्रेक्षा—

शार्दूलविक्रीडित.

श्यामा सर्पिणिवेणि ही रुळत जी पाठीवरी दीसते
गेलेली चढुनी नितंब वरती मागूनि ही भासते
सिंदूरासम सांद्र जीभ पुढती चाटावया इच्छिते
वक्त्रेंदूंतिल ती सुधा, सपदि हें माझ्या मनीं वाटतें ॥ २४५

कोणी एकाचा स्वानुभूत चमत्कार—

शिखरिणी.

अकस्मात् एकांतीं सदनिं दयिता-भेट पडुनी ।
न ती आलिंगीली भिउनि कुणि पाहील म्हणुनी
तयें मातें मानी निपुण अथवा अज्ञ? सम ती
अवज्ञा केली कीं? कळत नच झालों जडमती ॥ २४६

बुद्धीचा विकास केव्हां होतो?—

गीति.

देशाटन करुनी जो पंडितसेवा सदैव ती करितो
होते विस्तारिता तद्बुद्धि जळीं तैलबिंदु जें होतो ॥ २४७

संकुचिता बुद्धि कोणाची होते?—

गीति.

देशाटन करि ना जो, पंडितसेवा तशी न जो करितो
होते संकुचिता तद्बुद्धि जळीं आज्यबिंदु जें होतो ॥ २४८

भूमाता आणि परमेश्वर यांना नमन करावें ! कारण—

शार्दूलविक्रीडित.

भूमीच्या वरती पदस्खलन तें झालें तरी आसरा
देऊनी पद सांवरी जननिशी माता तशी ही धरा
पापक्षालक कोणिही जगिं नसे ईशाहुनी दूसरा
यासाठीं नमना तयां करित जा जोडूनि दोन्ही करां ॥ २४९

रामभृगया आणि हरिणीभ्रम—

शार्दूलविक्रीडित.

श्रीरामें मृगयेस जाउनि शरा चापासनीं मांडिला
लक्ष्यातें धरुनी मृगीवरि तयें आकर्ण तो सोडिला
न त्रासे न पळे मृगी न चकिता झाली न कंपायुता
भ्रांतीनें मज अर्पिण्या मदन त्या झाला शरा सोडिता ॥ २५०

दुर्योधनमित्र कर्ण व शीत यांवर श्लेष—

उपजाति.

कन्याप्रसूतें धनुच्या प्रसंगें
शक्तिप्रभावर्धन होइ वेगें
धनंजयाहातिं पराभवाची
शीतास कर्णास चि प्राप्ति साची ॥ २५१

मेघावर परचक्राचें रूपक—

मालिनी.

पवनचपलवेगी स्थूलधाराशरांचा
स्तनितपटहनादी स्पष्टविद्युध्वजाचा
हरण करि करांतें मेघ व्योमीं शशीच्या
नृपसम पुरमध्यें मंदशक्ती अरीच्या ॥ २५२

दानौदार्य आणि वित्तसंचय हीं काय करतात ?—

गीति.

गौरव प्राप्ती होते दानानें, संचयें न ती होते
उच्चस्थिति मेघांची; अब्धिस्थिति जशि अधःस्तनी असते ॥ २५३

कोणालाही कोणा तरी थोराच्या अधिष्ठानावांचून महत्त्व येत नसतें—

गीति.

थोर न पूजिति तोंवरि गुणि नर तरि लोकमान्य नच होतो
सौरमणी कांताचा परि रविपादाविना न तेज वितो ॥ २५४

प्राण सुरक्षित राहून संकटमुक्त झाल्याबद्दलची अन्योक्ति—

वसंततिलका.

स्वस्त्यस्तु विद्रुमवनें, नमितों मणींना ।
कल्याण इच्छि तव मौक्तिक शुक्तिकांना
साफल्यप्राप्ति उदधे, मज झालि बोलें
त्वद्घोरशा जलचरें नच फाडियेलें ॥ २५५

मदनवर्धक स्त्रीच्या यौवनाचें वर्णन—

शिखरिणी.

करीं केशां होती धरुनि तरुणी स्नानविरता
उभी हर्म्याग्रीं ती, हरनयनतेजें तनुहता
करी मुग्धा दुग्धांबुधिवहलकल्लोल सदृश्या
दृशीं वारंवारें मदनतरुला पालवि वशा ॥ २५६

माझी प्रिया मला—

गीति.

तल्पीं प्रभुसम, गुरुसम मनसिजशास्त्रीं, श्रमीं भुजिष्य जशी
गेहीं श्रीसम, गुरुजन सन्मुखिं व्रीडाच होय ती मजशी ॥ २५७

अनिमिष ( देव ) या शब्दावरील श्लेष—

गीति.

वक्षोरुह तन्वीचे हेमाचल दिव्य ते जरी नसते
चढतां त्यांवरि कैसे अनिमिष मन्नेत्र जाहले असते ? २५८

चंद्रबिंबरूप वदनावरील अंधकाररूप केशांना पाहून—

दिंडी.

तमस्तोमा, शोभसी बहु व्योमीं
चंद्रबिंबाच्यावरी सरळ कामीं
धूमपानें याहुनी उच्च साची
स्थान प्राप्ती कोणची व्हावयाची ? ॥ २५९

शृंगाराचें सावयव रूपक—

दिंडी.

घटीयंत्रासम हार नाभिकूपीं
मृगदृशीच्या लावण्यवारिरूपीं
प्रथमवयसद्रुमा सिंचण्यातें
लोंबतो हा हें मनीं मादिय येतें ॥ २६०

उजाडलें तरी मानिनीची समजूत पटेना, तेव्हां तिला तिचा प्रियकर म्हणतो—

पृथ्वी.

कृशोदरि निशा कृशा, तरि न खर्व तन्मान तो
पुरोदिगनुरागिणी, उदित हो न तद्राग तो
प्रसन्न नभ जाहलें, परि न तूं प्रसन्ना तशी
रवा करि मयूर गे वससि काय मूका अशी ॥ २६१

गोपीला गोप विचारतो—

मंदाक्रांता.

उष्णश्वासा त्यजिसि न तसे गाल नीरक्त कान्ते
अभ्रांतीनें बघाशि नयनीं ओळखीशी तयांतें
कीलाचारा वारिसि, अजुनी यामुळें मानसातें
वाटे नाहीं मुरलि-रव तो कर्णि गेला तुझ्या, तें ॥ २६२

गोपी बावरलेली पाहून तिला गोप विचारतो--

पृथ्वी.

सुटे त्वदिय नीविका, पुलकभार गालांवरी,
तशीच नयनस्थिति स्फुरण दाविते बावरी,
वच स्फुट उठेच ना, तव गळा बहू दाटला,
मुरारिमुरलीरवा श्रवणिं काय तूं ऐकिला? ॥ २६३

अभिसारिकेला एक प्रणयोत्सुक म्हणतो—

शार्दूलविक्रीडित

मालामौक्तिक हेमरत्नवलयश्रेणीस त्यां काढुनी,
मंजीरध्वनि आंवरूनि, वपुला नीलांबरीं झांकुनी
जातेसी बहुसाहसें परि न त्या साह्यानि संगोपना
धम्मिल्लच्युतमल्लिगंध करितो रात्र्यानिल स्फोटना ॥ २६४

निसर्गस्वभावांचे मासले—

दिंडी.

मेघ होती गत असे विशाखांतीं
प्रसूत्यन्तीं यौवना येइ शान्ती
शिष्टकोपातें नमन लया नेतें
गौरवाला याचना बळी देते ॥ २६५

पारमार्थिक गोष्टीहि नुसत्या चुंबनसुखापुढें व्यर्थ होतात—

गीति.

शशिवदना गजगमना सिंहकटी प्राप्त मात्र चुंबाया
झाली, जरि तरि जप तप समाधि होते समस्त तें वांया ॥ २६६

बऱ्यावाईटाची किंमत—

गीति.

पादाहति हरिची ती श्लाघ्या, श्लाघ्य न खरावरी बसणें
विदुषीं स्पर्धा युक्ता, युक्ता न च मंदमैत्रि ती करणें ॥ २६७

राधा हा शब्द राधेच्या डोळ्याला उलटा म्हणजे धारारूप केव्हां दिसेल ?—

गीति.

पुनरपि मथुरा त्यागिल हरि तरि होईल राधिका कष्टी,
राधानयनीं राधानामविपर्यय पडेल तो दृष्टीं ॥ २६८

सर्व गुणांना निष्फळ समजून सुवर्णप्राप्तीचा उद्योग कर—

दिंडी.

क्षुधाशान्ति व्याकरण करित नाहीं
काव्यरस नच शान्ति दे तृषेलाही
गोत्रपोषण छंद तें करि न कांहीं
गणुनि निष्फळ गुण हेमकार्य पाहीं ॥ २६९

लक्ष्मी आपलें ब्राह्मणापाशीं न राहण्याचें कारण सांगते—

स्रग्धरा.

प्याला रागें पित्याला, समचि वध दुजा लाथ मारी पतीला
आबाल्याद्विप्र तैसे स्ववदनविवरीं ठेविती वैरिणीला
मद्गेहा कांपिती ते प्रतिदिवशिं उमाकान्तपूजानिमित्तें
तस्मात्खिन्ना अशी त्या द्विजकुलनिलयीं राहणें मी त्यजीतें ॥ २७०

गाढवाला गुळाची काय चव—

गीति.

कर्कशतर्कविचारव्यग्राला काव्यहृद्य काय कळे ?
ग्राम्य क्षेत्रप त्याला चंचलनयनोक्तिवर्म तें न वळे ॥ २७१

जगन्नाथराय पंडित स्वकालीन कवींशीं स्वतःची तुलना करतात—

गीति.

कविता पंडितराय प्रथिती विद्वान अन्यही प्रथिती
शंकर तांडव करि तरी वेतालादिक पिशाचही करिती ॥ २७२

पार्वतीचें विरहवर्णन—

शार्दूलविक्रीडित.

धम्मिल्लावरि गुंफिते न सुमनें, शोभा न दे आनना
क्रीडाचंचुसवें वचासि करिते साक्षेपशा कांहिं ना
सोल्लासा न धरी सखीजनसवें भाषा न तीं बोलते
म्लाना चंपकमालिकेसम वनीं मेनात्मजा वर्तते ॥ २७३

खलाचा स्वभाव—

वसन्ततिलका.

सत्कारिला खल तरी कलहा करी तो
थोरांसवें, प्रकृतिला तिळ न त्यजीतो
काकासि त्या जरि पयाशनिं पोशियेला
पावेल काय तरि तो कलहंसतेला ?॥ २७४

प्रियेच्या गळ्यांतील मणिमाला कशी दिसली ?—

शार्दूलविक्रीडित.

तन्वीनें मणिहाररूपलतिका कंठावरी घातली
उत्तुंगस्तनिं भारभूप वसला त्या ती पहा जाहली
स्नानें शांत करावया गलद्रापासूनि शुभ्रा अशी
दुग्धाची जणुं भासते हळुहळूं वाहेच धारा जशी ॥ २७५

जीवनागाराला व्यर्थी उपदेश—

अनुष्टुभ्.

रे कूप जीवनागारा। दातृत्वा इच्छिसी जरी
तूं तरी गुणरत्नपात्रा । एका सन्निध रे करी ॥ २७६

ईशपदीं तल्लीन झालेल्या स्त्रीचें कामी पुरुषास उत्तर—

गीति.

गे द्रुतपदगामिनि तूतें भान नसे च्युत तुझा अलंकार
अच्युत शोधातरिं मी च्युत ते सर्वहि परी न हाकार ॥ २७७

## आश्रित जन दूर अथवा समीप—दात्याला सारखेंच !—

वसन्ततिलका.

दाता परोपकृतिनिर्भरचित्त ऐसा
दूरी समीप न च भाव तयासि तैसा
भानु प्रफुल्ल करि पंक्ति सरोरुहाची
पाणिस्थ पंकज तशी भुवनांतरींची ॥ २७८

## काश्मीरांत कवठांचीं झाडें कां नाहींत ?—

शार्दूलविक्रीडित.

काश्मीरीं सफला वनस्पति कपित्थांचे परी वृक्ष ते
दृष्टीला पडतीं न कांहिंच मनीं आश्चर्य हें वाटतें
जेथें चुंबनशील गोल उरजां नारी उरीं पोशिती
तेथें लाजुनियां कपित्थ रुजुनी जन्मा न हो पावती ॥ २७९

## लेखांतील अक्षरें कशीं असावींत ?—

दिंडी.

समश्रेणीवर्तुळाकार साचीं
अक्षरें घन काढावि लेखनींचीं
परस्पर तीं सलग्न न लों द्यावीं
तरुणिकुचकुंभासारखीं दिसावीं ॥ २८०

## विरहिणी स्त्री सखी बरोबर प्रियाला निरोप धाडते—

मंदाक्रांता.

त्याला सांगे विरहहुतभुक् वाढला स्नेहयोगें
मद्देहाची मदन सपदीं आहुती देइ अंगें
यज्ञा, द्यावे उचित गमतें दक्षिणे प्राण साचे
तत्स्वामी तूं म्हणुनि पुसतें आदेशा धाडि वाचें ॥ २८१

सूर्यावर उत्पेक्षा--

स्रग्धरा.

कीलालीं कुंकुमांचे जगतभर सडे दीसती टाकिलेले
कारापद्मस्थ मत्तभ्रमर किति तरी भ्रामति सोडिलेले ॥
मुक्ताशा गोसहस्रा श्रुति श्रवण करी त्या द्विजांच्या रवाला
भाग्यें वृंदारकांच्या सुरपतिदयिता देई जन्मा सुताला ॥ २८२

नव पतिसंगमाच्या प्रथम योगांतील लज्जान्हासनिपरूण---

शार्दूलविक्रीडित.

अन्योन्यां बघतां दृशांतुनि मुखीं ही बैसली जाउनी
संलापें मुख सोडुनी कुचतटीं झाली स्थिता आसनीं
गाढालिंगनिच्या प्रसंगिं उतरे तेथूनि नीविस्थलीं
भर्ता सोडि तिला अम्ही न च अहो जाणों कुठें लोपली ॥२८३

सपत्नीचें लाक्षणिक वर्णन--

दिंडी.

बधिर होती कर्ण, तें आस्य मूक
होइ, नयनां अंधता ये विलोक
गात्रयष्टी पावते कुटिलता ती
धनामय हे जगतांत चित्रकान्ती ॥ २८४

सच्छिद्र, निर्मळ आणि कुटिल या शब्दांवरील श्लेष---

गीति.

सच्छिद्र मध्यकुटिल स्वर्णालंकार कर्ण तो मिळवी
निर्मळशा नेत्रांची धिग्दैवा कज्जलप्रभा मळवी ॥ २८५

श्रीकडून सरस्वतीची अनास्था---

गीति.

जन्मापासुनि अनुगत नालातें कमळ विमुख तें होतें
तद्वल्लक्ष्मीप्राप्ती आनास्था विद्वर्सी सदा करिते ॥ २८६

परमेश्वराची इच्छा असल्यावर कोणाचें साहाय्य लागत नाहीं—

उपजाति.

कर्मा कराया प्रभु इच्छि जेव्हां
साह्यार्थ कोणी नलगेचि तेव्हां
पांचालजेच्या पटसंविधानीं
वेमा-तुरी चालविल्या न कोणी ॥ २८७

लज्जेच्या झोंपाळ्यावरील मदनाचें आंदोलन—

भुजंगप्रयात.

कुलाचार, प्रेमा, मनीं वल्लभाचा
द्वयस्तंभ हे, त्यांवरी स्त्रीहृदाचा
रुळे प्रेंख त्याच्यावरी तो बसोनी
सदा मार आंदोळतो ह्री धरोनी ॥ २८८

प्रभातकाळीं निजून उठल्यावर केश सांवरीत बसलेल्या प्रियतमेस पाहून कोणी शृंगारिक पुरुष म्हणतो—

शिखरिणी.

प्रिया ती प्रत्यूषीं गलित कच बांधीत असतां
उडे स्कंधप्रान्तीं पदर, उरजां मी निरखितां
तिनें मंदाक्षानें वळुनि हंसुनी जें बघितलें
तया वर्णायातें सुरपरसनाही न च हले ॥ २८९

भामिनी स्त्रीचें प्रातरालिंगन—

शार्दूलविक्रीडित.

भांडूनी मुख अश्रुनीं मळवुनी शय्या क्षणीं सोडुनी
क्रोधें क्रंदुनि कामगर्भभवनद्वारासि उल्लंघुनी
झाली ती बघती प्रभेविण शशी प्रत्यूषवाताहता
'गेली रात्र क्षणीं' वदूनि कवळी भर्ता क्षणीं मागुता॥२९०

**कोणत्याहि स्थित्यवस्थेंत योग्य तेंच केलें पाहिजे !—**

वसंततिलका.

विश्वेश्वरांतर सुधी विसरूनि गेला
विश्वेश्वरार्चन असे तरि योग्य त्याला
प्राणेश्वरांत चतुरा मिळते स्वचित्तें
वस्त्रावृता परि तया पुढतींच जाते ॥ २९१

**कामिनीच्या हृदयसान्निध्यापुढें सर्व कांहीं तुच्छ आहे !—**

तोटक.

उडुराजमुखी मृगराजकटी
गजराजविराजित मंदगती
जरि ती वनिता हृदयानिकटी
जप तो तप तें सगळें फुकटीं ॥ २९२

**विरहानें प्राण सोडायला ती तयार झाली पण प्राण देहाला कां सोडीनात ?—**

मालिनी.

तव विरह सहेना यास्तवें सिद्ध झाली
स्वकिय सखि कराया प्राणघाता अकालीं
रुचिरतनु पुन्हां तो प्राप्त होणार नाहीं
म्हणुनि अतनु व्हाया प्राण माघार घेई ॥ २९३

**अंगीं विवेकशक्ति नसेल तर बहुश्रुतपणा व्यर्थ होय !—**

दिंडी.

विवेकाचें बळ नाहिं ज्यास ऐसा
बहुश्रुतसा नर तरी व्यर्थ तैसा
जशी दर्वी ती पाकरसीं होते
शास्त्र त्याचें समजतें परि न तीतें ॥ २९४

**कोणाच्या तारुण्याला पुनःपुन्हां कोण वाढवितें ?—**

उपजाति.

श्री ती नरांचें, पति अंगनांचें
वर्षा नद्यांचें, ऋतुराट् तरूंचें
स्वधर्मचारी नृपति प्रजांचें
वृद्धीस तें यौवन नेति साचें ॥ २९५

**स्वार्थी संतुष्टता—**

मालिनी.

मजसि नृपति देवो द्रव्य वा तें न देवो
श्रुति परि मम त्याच्या भाषणें शुद्ध होवो;
रतिमति मनिं ठेवो ती नवोढा न ठेवो
पद परि गृहकेलीदेहलीलाच लावो ॥ २९६

**भट्टतट्टूची थट्टा—**

मालिनी.

गळति नयन ज्याचे, जानु सल्लग्न त्याचे
स्खलति पद अशाचे पावलोंपावलीचे
विहरति जरि लाखों मक्षिका त्यावरी तें
तरि सहजचि शोभे भट्टतट्टू धन्यातें २९७

**कोणी कवि विजयी आणि पराजित अशा राजद्वयांचें वर्णन शब्दश्लेषांत करतो—**

शार्दूलविक्रीडित.

द्वारीं खड्गिनिवास, बाह्यप्रसरीं प्रस्विन्न गंडेभ ते,
मध्यें कंचुकिरत्नधारकतती सर्वत्र संचारते,
शय्यामंदिर शत्रुच्याच महिषी प्रेमांत आक्रांतिती
राजा पोशि चिरंतन प्रणयिनी शून्याच राजस्थिती ॥ २९८

आशातृष्णामहिमा—

दिंडी.

दांत पडले केशही शुभ्र झाले
जीभ अडखळुनी पदोपदीं बोले
देहपातातें सज्ज हो तथापी
सती तृष्णा तें सोडिना कदापी ॥ २९९

स्त्रीसंगाचा तिटकारा येतो पण सोडवत नाहीं—

मालिनी.

क्षणभर टिकणारा स्वप्नसा भासणारा
विरसचि परिणामीं अंगनासंग सारा
जरि मनिं शतदां हें तत्त्व प्रत्यक्ष झालें
तरि नच हरिणाक्षी विस्मरे कांहिं केलें ॥ ३००

उदार मनेंच जगाला संतुष्ट करतात—

वसन्ततिलका.

उच्चासनाक्रमक उच्चमनःसमर्थी
त्यांच्याकडूनि कृतकार्य असेचि अर्थी
धाराधरांकडुनि शांति धराधरांची
नीचा नद्यांकडुनि ती न च व्हावयाची ॥ ३०१

स्तुतिरूप कन्या अद्यापि अनिवार्यपणें अविवाहिता कां राहिली आहे?—

गीति.

अद्यापि वाहते ती स्तुतिकन्या दुर्निवार्य कौमार्या
तिजसी असत् न रुचती सत् जे त्यांना रुचे न ती भार्या ॥ ३०२

मूषक आणि दूषक यांचें साम्यवर्णन—

गीति.

बहुनिष्कपटद्रोही आति धान्यांचा विघातकी असतो
रन्ध्रान्वेषी मूषक, दूषक तैसा जगांत हो वसतो ॥ ३०३

**निर्गुण या शब्दावरील श्लेष—**

दिंडी.

निर्गुणाला मृत असें मानितातीं
उभयकार्यीं तद्दीप्ति मालवे ती
धनुष्याला गुण नसे जोडण्यातें
तरी जगतीं व्यर्थ तें साच होतें ॥ ३०४

**कोणत्याहि स्थितींत जीव जगविणेंच इष्ट असतें—**

वसन्ततिलका.

अंतस्थतप्तमरुसैकिततप्त होई
मूळीं न चंपक असा सुमनास येई
प्राप्ता स्थिती अनुचिता अशि ज्यांस झाली
त्यां इष्ट जीवपरिपालन आर्तिकालीं ॥ ३०५

**एका विरहिणीचें वर्णन—**

मंदाक्रान्ता.

स्कंधोपांतीं अलक रुळती, आस्य हस्तावरी तें
उष्णश्वासा त्यजित अधरीं योजुनी तर्जनीतें
ध्यासा पेशा धरुनि बसली अश्रु नेत्रीं भरोनी
ती हो द्वारा विरतविषया पाहि स्वैरें करोनी ॥ ३०६

**नायकाची स्थिति कवीप्रमाणें झाली असल्याचें कोणी दूती कोण्या नायिकेला सांगते—**

गीति.

पदशब्दलीन होतो रूपालंकारभावनाचतुर
कवि, सम विनिहितनिद्रस्तरुणि तवार्थी च तरुण तो अतुर॥ ३०७

**वार्धक्यांतहि चित्त धनांगनांत गुंततें—**

गीति.

विश्लिथदंतावलि ती, कच ते काशप्रसूनसंकाशी
डोळे तमसालय परि चित्त वसे तें धनांगनांपाशीं ॥ ३०८

**लब्धप्रतिष्ठित—**

शार्दूलविक्रीडित.

मीमांसा पढुनी न, त्या उपनिषद् ग्रंथांस ना ऐकिलें
श्रीमच्छंकरभाष्य ना भगवती गीतेस अभ्यासिलें
सिद्धान्तापगती शिरोमणिमतीं किंचित् मति प्राप्त ते
भट्टाचार्यपदास सेविति तयां लज्जा न कां वाटते ? ॥ ३०९

**हताश झालेली स्त्री आपल्या पतीला म्हणते—**

शिखरिणी.

असे दोघांची ती प्रथम अविभक्ता तनु अती
पुढें तूं प्रेमी मी तव बहु हताशा प्रियवती
अतां तूं भर्ता मी तुजप्रति कलत्रापरि असें
मिळे मत्प्राणांच्या कुलिशकठिणाचें फळ असें ॥ ३१०

**व्याजनिंदा अलंकार—**

शार्दूलविक्रीडित.

साक्षी ठेवुनि शंभु तो सगिरिजे स्वर्गापगेच्या तटीं
प्राणांचीं शरणें कलेवरधनें ठेवीयलीं सज्जटीं
त्यांनीं नैक उपाय ते करुनिया संप्रार्थिली काशि ती
देईना परि मागुती मुनि तया धन्या कशी बोलति ॥ ३११

**दोषा ( दोषा–रात्र ) या शब्दावरील कोटी—**

वसन्ततिलका.

दोषागमास्तव रवि क्षितिजांत गेला
पाहूनि तें शशि तरी उदयासि आला
स्वाभाविकेंच जरि होय कलंकि त्याला
शंका न ये किमपिही मुख दाविण्याला ॥ ३१२

## गोपींच्या नेत्रांतील निरंजन ब्रह्माचें अंजन—

दिंडी.

तपश्चर्या ती कोणे नाहिं केली ?
परी गोपींच्या फळा तीचि आली
निरंजन जें ब्रह्म तें नेत्रिं बैसे
अंजनासम त्यांचिया सुखें तैसें ॥ ३१३

## रतिसंगरानंतर अवशेष असें काय काय उरलें ?—

वसंततिलका.

आश्लेष शेष उरला रतिसंगरींचा
आमोद तो सम तसा कुचकुंकुमाचा
तूणीर राहि अवघा कुसुमायुधाचा
प्रत्यूषकाळ अवशिष्ट विभावरीचा ॥ ३१४

## सीता आणि त्रिजटा अशोकवनिकेंत असतां एका कीटकाला एका भ्रमरीनें पकडिलेला पाहून, त्या दोघींत पुढील प्रमाणें संवाद झाला—

शार्दूलविक्रीडित.

सीता— कीटाचें भ्रमरींत ध्यान निरतें पावेच तद्रूपता
रामीं मी त्रिजटे बने सम मुकें दांपत्यसौख्यामृता
त्रिजटा— होई हें कृतकृत्यता तरि, बने सीता स्वता राम तो
तूं राम स्वरुपांत भेटसि तिला मारूनि लंकेश तो॥ ३१५

## भ्रांतिनिरास—

गीति.

हें रूपमात्र आहे चित्रांतिल कनकवर्णकल्हार
मकरंद ना सुगंधहि कां फिरसी व्यर्थ भंवति तूं भ्रमर ? ३१६

**ज्याचें कर्म तोच जाणें, भलत्याच्या हातून होणें शक्य नाहीं—**

वसन्ततिलका.

धत्तूर धूर्त तरुणेंदुनिवास व्हाया
जें स्थान योग्य शिव दे तुज तें बसाया
रे, काय कैरव फुलें? तमनाश होई?
चंद्रोपल द्रवुनि, सिंधु उतास जाई?॥ ३१७

**वार्धक्यांतील मौर्ख्य—**

वियोगिनी.

ललिता गलिता रदावली
लवलीवद्धवली कचावली
न तरी हरिच्या कथीं रती
जरठीं मूर्खमती अशीच ती॥ ३१८

**उष्णकाळांतील मध्यान्हाचें वर्णन—**

वसंततिलका.

तप्ता मही विरहिणीसम चित्तवृत्ति
तृष्णाऽध्वगांत कृपणासम वर्धिता ती
मूर्खोक्तिवत् रविकरें करि तप्त भूला
छाया सतीसम न सोडित पादमूला॥ ३१९

**वीर आणि कवि यांची परीक्षा क्षणार्धांत होते—**

अनुष्टुभ्.

संग्रामीं सुभटेन्द्राचें, । कवींचें कविमंडळीं
तेज फांके तेज लोपे, । क्षणार्धीं क्षितिमंडळीं॥ ३२०

**भिक्षा मागणें एकवेळ कोणाला क्षम्य होतें?—**

अनुष्टुभ्.

अदृष्टमुखभंगासी । युक्त अंधासि प्रार्थना
डोळसा परि दुःखाचें । कृत्य तें होय याचना॥ ३२१

## वर्षाकालांतील रात्रीचें वर्णन--

शिखरिणी.

क्षपे क्षामी केली सरितजलवेगांसि हरुनी
प्रतप्ता उर्वीला करुनि तरुकुंजां सुकवुनी
रवी कोठें गेला म्हणुनि बघण्या त्या जलद तो
तडिद्दीपासंगें दिशि दिशि सवेगेंच फिरतो ॥ ३२२

## छेकापन्हुति अलंकारांतील गौरीहरांचा संवाद—

शार्दूलविक्रीडित.

स्वेदांगा दिसतेस कां प्रियतमे ? त्वन्नेत्रवन्हीमुळें
कां तूं कंपित भाससी मज सखे ? भोगींद्र भीतिमुळें
रोमांचान्वित देवि कां तव वपू ? गंगांभसाच्यामुळें
ऐशी पार्वति भावगोपनपरा रक्षो मनूचीं कुळें ॥ ३२३

## शत्रूवांचून शिक्षण नाहीं—

इन्द्रवज्रा.

जीवंत मच्छत्रु सदा रहावे
त्यांच्या प्रसादें मज बुद्धि पावे
जे जे मला बाधक साच होती
ते ते मला योग्यचि बोध देती ॥ ३२४

## औदार्य आणि गुणग्राहकता जेथें असतात तेथेंच काव्याचें बीज होतें—

पृथ्वी.

जरि प्रभु उदारधी सुरसकाव्य कौतूहलीं
सभासद गुणग्रही असति योग्य ऐशा स्थलीं
सुवर्णसदलंकृता अभिमुखाच नृत्योद्यता
सदैव रसनानटी, प्रसवि मोद ती तत्वता ॥ ३२५

## सिंह आणि डुकर यांचा संवाद—

अनुष्टुभ्.

डुकर— दश व्याघ्रां सप्त सिंहां। तीन हत्तींस जिंकिलें
बघोत आज सर्वा त्या । देवता युद्ध आपुलें
सिंह— भद्र सूकर हो तूझें । जा वदे सिंह जिंकिला
सिंहसूकर यांच्या ते । ज्ञानी जाणति रे बला ॥ ३२६

## धनावांचून पुरुषाचीं ऐश्वर्यें—

गीति.

निर्गदता विद्वत्ता सज्जनमैत्री महाकुलीं जनन
स्वाधीनता च पुरुषा महदैश्वर्यें अशीं धनावीण ॥ ३२७

## कोणी उत्कंठित म्हणतो—

शार्दूलविक्रीडित.

धन्या ती गृहदेहली खुलवि ज्या तत्पादपद्मप्रभा
जाता ती सरसी जयांत विहरे ती कौतुकें सारभा
तन्नेत्रें अवलोकिला जगिं असा जो धन्य हो वंद्य तो
धिग्धिग् तो विधि ! योग यांतिल मला कांहीं न कां अर्पितो!॥ ३२८

## उत्तमवस्तुप्राप्ति हलक्या तपश्चर्येनें कशी होणार ?—

वसंततिलका.

मंदाकिनीपय पिण्यास सदा असावें
मंदाक्षि-ओष्ठ-रसपान सदा घडावें
क्रीडेस मंदरवनावलि ती असावी
मंदानुसारतपनें कशि हीं मिळावीं ? ॥ ३२९

## गुणवान् या शब्दावरील श्लेष—

गीति.

गुणवान् असा हृदांतुनि अनवसरीं हार दुर करिताती
भूपहि पसरी हाता एक शलाकार्थ हीच जनरीती ॥ ३३०

मराठी ग्रंथ संग्रहालय

स्त्रियांचें जगन्मोहनसाहित्य—

शिखरिणी.

ललाटीं कस्तुरी-तिलक, नयनीं कज्जलरेखी
श्रुतिद्वंद्वीं साजे विमलमणिताटंक समची
गळीं मुक्तामाला, शुचिवसन-अंगें मिरवणें
जगन्मोहा योषा वरिति सम बाह्योपकरणें ॥ ३२१

दैव फिरलें म्हणजे सर्व उलटें होतें—

वसंततिलका.

होई विरुद्ध विधि, तोय पयोनिधींत
ना सांपडे, समचि बिंदु सुधाकरांत
इच्छीत कार्य न घडे अमरद्रुमानें
मेरूंत हेम गवसे न परिश्रमानें ॥ ३३२

एक कामी पुरुष एका नवयौवनेला पाहून स्वगत म्हणतो—

शार्दूलविक्रीडित.

नेत्रांनीं बघतां इयेस चढतो उन्माद माझ्या मनीं
तैसा मोद भरे हृदांत, हदरे मद्देह रोमांतुनी
मूर्च्छा येइ क्षणांत हें जग मला भासेंच अस्पष्टसें
ही का मद्यमयी, सुधामयि, हलाहालमयी हो असे ॥ ३३३

गुणाचे चहाते दोषयुक्त गुणाची प्रशंसाच करतात—

गीति.

गुणवंताचे ठायीं दोष बघूनी गुणज्ञ खेदातें
न च पावती, विलोकिति प्रेमानें त्या कलंकि चंद्रातें ॥ ३३४

एका विरहणीची उक्ति—

गीति.

स्वप्नांत वल्लभाचा होय समागम अशा स्त्रिया धन्या
कान्तासह निद्रा ती वैरिणि माझी गता जशी वन्या ॥ ३३५

चहाडाच्या जिभेचा परिणाम—

पृथ्वी.

खलाननबिलेशया विषमया अपूर्वा अशी
गमे जगातिं जीभ ती अढळ दंदशूका जशी
डंसेच अपुल्या मुखें श्रुतिशिफीं दुज्याच्या तरी
गतायु तिसऱ्या जगीं सहज क्रीडनें ती करी ॥ ३३६

आपल्या प्रियेच्या कानांतील कुंडलाला हलतांना पाहून एक रसिक त्या कुंडलाला म्हणतो—

शार्दूलविक्रीडित.

तूं पूर्वीं पवनाग्निशस्त्रसलिलां सेवूनि दुर्बोधसें
केलें जें तप, हेमकान्तिफळ हें देहा तुझ्या प्राप्तसें
मुग्धापांगकपोलचुंबनसुखा रत्नोत्तमीं संगती
लाभे कुंडल, वांच्छिसी किमपरा डोलोनि मूढा अती?॥ ३३७

एकजण मूर्ख राजाची हकीगत गाढवाला सांगतो—

शार्दूलविक्रीडित.

रे रे रासभ वस्त्रभार वहुनी कुग्रास कां भक्षिशी ?
राजाश्वालयिं जा सुखें चणक ते खाई रहा वस्तिशीं
ज्यातें पुच्छ तयासि अश्व गणिती तत्राधिकारी असे
राजा तद्दुपदेशवर्तक, उदासीनांस चिंता नसे ॥ ३३८

पृथ्वीवर सर्वोत्तम वस्तु कोणची ?—

भुजंगप्रयात.

बिडौजें विधीला असा प्रश्न केला
वदे भूवरीं सारवस्तूस याला
चतुर्भिर्मुखें दीधलें उत्तराला
तमाखुस्तमाखुस्तमाखुः-तयाला ॥ ३३९

खंडिता मानिनीची स्वगता उक्ति—

द्रुतविलंबित.

स्फुरसि बाहुलते उगि कां असी ?
धरिच लोचन वाम सुशान्तिशी
मजकडे जरि ये अपराधि तो
न परिरंभि तयासि न लक्षि तो ॥ ३४०

मेघावर अकिंचनत्वाचा आरोप—

शिखरिणी.

फिरे प्रासादीं जी नृपतिरमणीसंहति तिची
गवाक्षद्वारानें हरिलि स्तनयित्नें तनुरुची
क्षणीं गुप्तागुप्ता क्षणरुचि मिषें दावित असे
जसा स्वर्णी खेळे करगत दरिद्री सम तसें ॥ ३४१

सुभाषितरस कसा आहे ?—

वसंततिलका.

जो विक्रिया न पावता सरसत्व घेतो
जाड्या हरूनि रुचिला बहु वाढवीतो
हो क्षीण ना बहुजनीं जरि प्राशियेला
त्या हो सुभाषितरसा न दुजा सरीला ॥ ३४२

स्त्रीचा अधर कसा असतो ?—

गीति.

पल्लावें न च ती माधुरि, सुधेप्रतीं शोणिमा तशी नसते
मृदुताभावीं विद्रुम, परि ती दयिताधरीं त्रयी वसते ॥ ३४३

दुर्जनाच्या संगतान साधूचें शील सुटत नाहीं—

गीति.

दुर्जनसहवास घड शीलोत्कर्षा न साधु सोडिति ते
रविचा संगम सुटतां शशिघटना प्रगट शीतता करिते ॥ ३४४

अ: के.

**दैवभ्रष्ट कोणाला समजावें?—**

शार्दूलविक्रीडित.

द्यूतें जो धन इच्छितो सम तसा सेवेंतुनी मान तो
भोगप्राप्ति मनीं धरी सुरुचिरा जाऊनि भिक्षेस तो
अर्थावांचुनि वेदपाठ करितो मोक्षार्थ तोही तसा
दैवभ्रष्ट म्हणा तयास जगतीं मूर्खांतरींचा असा ॥ ३४५

**'वारण' आणि 'मद्वारण' या दोन शब्दांतील गर्भितार्थावर श्लेष—**

गीति.

राजा वारणलाभ द्वास्थांच्याकडुनि जाहला मातें
मद्वारण इच्छेची आशा मज यापुढें अतां उरते ॥ ३४६

**दारिद्र्याच्या पोटीं येणारे दुसऱ्याच्या दुःखाचे वेग कसे शमवावे?—**

गीति.

दारिद्र्यानलतापीं शान्ती संतोषनीर तें प्रसवी
याचकवांच्छाभंगें होई मनिं दाह कोण त्या शमवी? ॥३४७

**मानी पुरुषलक्षण—**

गीति.

सहतो शरशतघातां हय प्रतोदा कधीं न तो सहतो
सहतो विपत्सहस्रां मानी अपमान लेश नच सहतो ॥ ३४८

**भामिनी स्त्रीच्या वल्लभाचें निसर्गाशीं भाषण—**

मंदाक्रान्ता.

चंद्रा स्वेच्छें विहर गगनीं नम्रवक्त्रा प्रिया ही
नीलांभोजा विकस सहसा, मीलिताक्षी प्रिया ही
मुक्ता उक्ती करि पिक, धरी मौन माझी प्रिया ही
युष्मद्भाग्यें उदित, म्हणुनी भामिनी मत्प्रिया ही ॥ ३४९

तराजूला उद्देशून एक म्हणतो—

पृथ्वी.

गुरूंशि नमिशी जशी शिराशि तोशीं गे दाविशी
नती न, अति उन्नती मद्मतिप्रती तूं तशी
समाशि सम, ही कृती तव म्हणूनि तूं शोभशी
तुले न तुज योग्य तें कनक गुंजि जें तोलिशी ॥ ३५०

तराजूला उद्देशून दुसरा म्हणतो—

पृथ्वी.

प्रमाण तुजसी तुळे जगतिं सर्व ते मानिती
बघूनि चढलीस तूं गमत थोर गर्वाप्रती
गरिष्ठ तळिं ठेवुनी बहु लघूसि नेशी वरी
कृती तुझि तुलाच ही क्षणिक शोभते गे बरी ॥ ३५१

नैसर्गिक रचना बिनतोड असते—

दिंडी.

इक्षु जरि तो गांठ्याळ काय होतें ?
वर्णलोपें गायनीं रुचि न जाते
शशि न विकृत भासतो वक्रतेनें
दयितमाया जाइना अधनतेनें ॥ ३५२

संसारत्याग करवणारी बुद्धी कोणची ?—

अनुष्टुभ्.

पुराणांतीं श्मशानान्तीं । मैथुनान्तीं जशी मती
ती मती स्थिरता पावे । कोण राहील संसृतीं ॥ ३५३

विहिरींतून पाणी काढण्याच्या भांड्यावर उत्प्रेक्षा—

गीति.

दृढपाश गळीं बांधुनि कलशा कूपीं तुला ढकलिताती
धन्य परी तूं, करिशीं जीवन देउनि तृषार्तजनशांती ॥ ३५४

दुणावलेली कामबाधा दूर कशी होणार ?---

हरिणी.

व्यजनमरुतें निश्वासानें बहूष्णति येतसे
मलयजरसें नेत्राश्रूंचा समुद्भव होतसे
कुसुमशयनें कामास्त्रातें सहाय्याचि प्राप्त तें
द्विगुणगरिमा कामाची ही कशी च्युति पावते ॥ ३५५

स्त्रीसान्निध्य असलें तरी मुसळाला अंकुर फुटत नाहींत—

मालिनी.

जगातें विदित आहे काष्ठ तूं हें म्हणोनी
विपिनज मुसळा तूं वाढलेंसीच रानीं
नवकुवलयनेत्रीपाणिसंगोत्सवें ते
किसलय फुटती ना तूजला योग्य होतें ॥ ३५६

भामिनीप्रत प्रणयी भाषण—

शिखरिणी.

सुमध्ये वाग्भंगें वच करि मशीं वा करुं नको
स्मितज्योत्स्नावक्त्रे बघ मजकडे वा बघुं नको
त्रिलोकीं मूर्धन्या अशि विविधपुण्यें गुणवत
विलोकोनी तूतें सफल मम झालें जनन तें ॥ ३५७

आश्रमांतील वृक्षहि अतिथिसत्कार करायला शिकले आहेत असें वाटतें—

मालिनी.

मधुरमधुपनादें स्वागतीं बोलताती
नतशिरफलभारें नम्रता दावितातीं
करिति सुमविकीर्णें अर्घ्यदाना तरू हे
गमति अतिथिपूजाशिक्षणीं सिद्ध वा हे ॥ ३५८

कोणी याचक म्हणतो—

शार्दूलविक्रीडित.

मेरू दूर सरे, महान्हिमगिरि प्रालेयसा जाहला,
लक्ष्मीपूर्वक चंद्र याचकभयें क्षीणत्व कीं पावला,
कौपीना वरि शंभु, विष्णु सहसा नीरांतरीं राहिला,
वारांशी बनला अपेय, उरला दाता न कोणी भला ॥ ३५९

अद्भुत सामर्थ्याचें फळ—

शार्दूलविक्रीडित.

भेकानें उसळूनि राग करुनी नागाचिया आननीं
देण्या कर्णचपेट हात वरती केला भया त्यागुनी
नागानें नयनां मिटूनि साहिलें मानेस त्या पाडुनी
हें सारें तव मांत्रिका फळ असें लीलाबळालागुनी ॥ ३६०

परस्त्रीसक्त पतीशीं उपरोधिक भाषण—

वृत्तवैचित्र्य.

सत्यमेव वदसी पतिराया
जीव एक वच हें नच वांया
अन्यसुंदरिनखव्रण दीसती
तव वपूवरि ते मज बोंचती ॥ ३६१

मुंजराजानें भोजाच्या वधार्थ जे पुरुष धाडिले होते ते जो लेख घेऊन परत आले तो पुढीलप्रमाणें होता—

शार्दूलविक्रीडित.

मांधाता पृथिवीपती कृतयुगालंकार तो जाहला
सेतूला उदधीवरी रचियला तो रावणारी भला
सारे भूप युधिष्ठिरप्रभृति ते गेले रिते, यास्तवें
एकाच्या न सवें गेला धरणि ही येणार तूझ्यासवें ॥ ३६२

कृपणवित्तहरण अशक्य असतें—

पृथ्वी.

अयश्चणक चावणें, फणिफणामणी कर्षणें
करीस करिं तोलणें, जलनिधी पदें लंघणें
प्रसुप्तहरि बोधणें, निशितखड्गिं संरोपणें
घडे सकल हें, न तें कृपणचित्त हो ग्रासणें ॥ ३६३

वनांतला वेणुनाद ऐकून एक रसिक म्हणतो—

वियोगिनी.

मुरली महदीयवंशजा
परपुरुषें परिचुंबिली तरी
विजनीं विपिनीं भयातुरा
परमेशा स्मरुनी रवा करी ॥ ३६४

चंद्राच्या कलंकावरील उत्प्रेक्षा—

शिखरिणी.

दिसे चंद्रामाजी लवजलदवत् त्यास म्हणती
जरी लोकीं सारे शशक, परि ना ती मम मती
कटाक्षां फेकीती विरहि तरुणी निंदित असे
तयांचे झालेले गमति व्रण त्याच्यावरि तसे ॥ ३६५

यमुनातटाकावरील कोणी नाविक एका बुरखा घेतलेल्या स्त्रीस म्हणतो—

स्वागता.

नेइ तारुनि तुला यमुनेसी
वेतनाविण वरोरु तरेसी
काढि वस्त्र वदनावरुनी तें
येऊ चंद्र उदया मम नौतें ३६६

### शहाण्याचें कर्तव्य—

उपजाति.

परस्परीं संवादतां जडांनीं
मौना धरावें सततीं सुधींनीं
कोलाहलीं काकततींत कां तें
परभृताकूजित योग्य होतें ?॥ ३६७

### पेरावें तसें उगवतें—

अनुष्टुभ्.

ध्वान्तातें भक्षुनी दीप। कज्जला जन्म देतसे
जसें खावें अन्न नित्य। प्रजा तैशीच होतसे ॥ ३६८

### मेघाचा स्वभाव—

शिखरिणी.

तुझी मेघा आहे पटुमति जनानंदकरशी
खलांतर्यामी जो नादिपति तदंभांस हरशी
स्वभावें खारीं तीं करिसि मधु युक्तीस वरुनी
तयांतें वर्षूनी करिसि जगकल्याण सघनीं ॥ ३६९

### आपत्तिग्रस्तावर अन्योक्ति—

स्वागता.

तींच तींच कमलें जल तेंची
तींच षट्पदकुलें खग तेची
सर्व एकसमयीं गत झाले
पंकशेष अचिरें सर ठेले ॥ ३७०

### ताकापुरतें रामायण—

अनुष्टुभ्.

उपाध्याय तसा वैद्य। ऋतुकाळीं वरांगना
सूतिका दूतिका चारी। कार्यान्ती तृणवज्जना ॥ ३७१

सर्व गोष्टी दैवानुरूप होत असतात--

शार्दूलविक्रीडित.

अब्धिप्राप्तिच वाडवा जरि तरी तृष्णा न त्या त्यागते
मेघें तृप्ति न चातका, न अरुणा सूर्यामुळें पाद ते
शंभूच्या शिरिं वास नित्य घडतां चंद्र क्षयी राहिला
तस्मात् सत्पुरुषाश्रितासिहि मिळे दैवानुरूपें फला ॥ ३७२

मुक्तस्थिति व संगोत्तर स्त्रीस्वरूप यांचें साम्य—

गीति.

कांची धरि सन्यासा, अधरदुकूलें कलत्र त्यागियलें
अधरें रागा त्यजिलें, चिकुरांनीं मुक्ततेस वरियेलें ॥ ३७३

लक्ष्मी व्यर्थ कोणची ?—

अनुष्टुभ्.

पौरुष्यावांचुनी लक्ष्मी । तात्पर्यी व्यर्थ होतसे
वृद्धवृष तृणा खातो । यदृच्छें वाढलें असें ॥ ३७४

ग्रीष्मऋतूचें वर्णन—

शार्दूलविक्रीडित.

दिक्चक्रा मृगवारिनें कवळिलें, व्योमास भास्वत्करें
कांपीलें, जणुं अग्निरेणु खरशी धूळी धरेची भरे
घेती विश्रम पांथ वृक्षलतिका-छायांतरीं सांद्रशा
हस्तिक्रीडन रोधवी करुनित्या तोयाशयांची दशा ॥ ३७५

यौवनविधीचें कौशल्य--

पृथ्वी.

स्थिरत्व चपलेंत तें, प्रथन अंधकारा तसें
सुवास शशिरंतरीं, मधुस रंग ते चित्रसे
शिरीषनवदामनीं उदय चित्र शैलांप्रती
अम्हां कुशलता गमे नवयुवा विधीचीच ती ॥ ३७६

विरहिणी सतीचें वर्णनकथन--

गीति.

मित्रा धनलोभानें परदेशीं व्यर्थ भटकशी हल्लीं
वर्षे मौक्तिकनिकरां तव भवनद्वारिं कांचनी वल्ली ॥ ३७७

रतिसंगरांतील अतिशयोक्तीचें वर्णन--

शार्दूलविक्रीडित.

जे हो मन्मथसंगरीं विजयि त्यां सत्कार द्यायास ती
अर्पी वास कटीस, माळ उरजां, उत्तंस कर्णांप्रती
बिंबोष्ठां तशि वीटिका, स्मितमुखी हस्तां रणत्कंकणां
पश्चाल्लंघिनि केशपाशनिचय द्याह्यां करी बंधना ॥ ३७८

स्नेह शब्दावरील श्लेष---

इंद्रवज्रा.

स्नेहास्तवें तैलिक ही तिळांची
केलीस तूं बा स्थिति काय साची ?
त्यांचा तुझा द्वेष सदा जरी तो
जाणें न हो काय अनर्थ होतो ? ॥ ३७९

प्रियवल्लभाच्या ध्यासानें होणारी तनुस्थिति---

द्रुतविलंबित.

तळमळे उदकाविण मासळी
रविकरें सुकते नलिनी-कळी
तनुलता तशि या सुकुमारिची
दिसतसे प्रणयांकितदीप्तिची ॥ ३८०

विरहिणीची चंद्रनिंदा---

अनुष्टुभ्.

यदीय बल पाहोनी । मार्गस्थ प्रिय होतसे
अशा त्या दुष्ट चंद्राच्या । सखे पाहूं मुखा कसें ? ॥ ३८१

या जगांतलीं तीन सौख्यें —

उपजाति.

सुभाषितज्ञाप्रति भाषणाचें
संवाहन श्रेष्ठ सुरेश्वराचें
आलिंगनें तुंगपयोधरांचीं
प्रत्यक्ष सौख्यें जगीं तीन साचीं ॥ ३८२

मुक्त, बाल आणि अंबर या शब्दांचा विपरीत अर्थालंकार—

गीति.

धरणीवरि मुक्तांचें पतन तसे बाल मुक्त ते होत
अंबरचुंबित धरणी, विपरित हें, काय हो न विपरीत? ३८३

लक्ष्मीप्राप्तींतील थोरांची स्थिति—

अनुष्टुभ्.

अहो किति विचित्रें हीं । थोरांचीं चारितें अती
लक्ष्मीला तृण मानीती । तद्वारें नम्र तत्कृती ॥ ३८४

विरही जनाच्या भेटींतले प्रथमोद्गार—

शार्दूलविक्रीडित.

झाला प्राप्त सुदीन, पूर्ण घडलें साफल्य मज्जीविचें
कर्मांचें शिव जाहलें, विनटले उत्साह ते दृष्टिचे
दैन्यें संप्रति वास तो उचालिला मद्दु:खहृद्देहिंचा
आला योग तदीय वक्त्रविधुचा नेत्रांस सेवायचा ॥ ३८५

शेषानें मस्तकावर धरणीचा भार धरल्याबद्दल अन्योक्ति—

गीति.

तूं शेष भुवनभारें भारवली मान म्हणुनि वक्र तिला
न करी, एक तुला ते कष्ट परी सौख्य अखिल जगताला ॥ ३८६

चार प्रकारचे पुरुष विरळे असतात—

गीति.

विरळे ज्ञाते असती, निर्धनमैत्रीस ठेविती विरळे
विरळे परहिततत्पर, परदुःखें दुःख पावती विरळे ॥ ३८७

क्षमा यां शब्दार्थासंबंधानें हल आणि खल यांचें साम्य—

अनुष्टुभ्.

जन्मप्रभृति जो वक्र। हल तत्सम तो खल
सहनीं तन्मुखाक्षेपा। एक तेंच क्षमाबल ॥ ३८८

नैराश्योद्गार—

वसन्ततिलका.

हातीं न अर्थ न च सोडि मला दुराशा
औत्सुक्य दानिं धरि जीव बहुत आशा
यांचाच लाघवकरी, स्ववधांत पाप
प्राणा, त्यजी मज अतां न च देइ ताप ॥ ३८९

सभंग श्लेषयुक्त रामकृष्णांची स्तुति—

उपजाति.

जो पूतनामा रणलब्धकीर्ती
काकोदरोत्सेक प्रमाथिनर्ती
यशोदयालंकृत दिव्यमूर्ती
रक्षो यदुश्रेष्ठ यदुप्रपूर्ती ॥ ३९०

अस्वस्थचित्तानें कोणचेंच काम नीट होत नाहीं—

शार्दूलविक्रीडित.

ब्रह्मा स्त्रीरचना करी तंव तिच्या वक्त्रेन्दुच्या भ्रान्तिनें
तत्पद्मासनमीलनीं घडियलें त्यानें तिला घाइनें
मध्या विसमरला सुदीर्घ जघनां घट्ट स्तनां ठेविले
केशां वक्र, अशांत ज्या मन न हो त्याच्याकडूनी भलें ॥ ३९१

वस्तुमाहात्म्य वाढण्यास्तव—

अनुष्टुभ्.

जलीं तेल, खलीं गुह्य, । अल्पदान गुणीजनीं
प्राज्ञीं शास्त्र, प्रसरतीं । वस्तुमाहात्म्यकारणीं ॥ ३९२

आशाळभूत आणि निरिच्छ यांची स्थिति—

अनुष्टुभ्.

आशानाम मनुष्याची । विचित्रा शृंखळा असे
पळती ज्या बांधिते ती । मुक्त स्तंभित पंगुसे ॥ ३९३

चंद्रोत्पत्तीवर रामकीर्तीची उत्प्रेक्षा—

शार्दूलविक्रीडित.

रामा दिग्वलयीं भ्रमूनि शिरली त्वत्कीर्तिहंसी क्षणी
स्वर्गी ब्रह्ममराळसंगमवशें झाली स्वयें गर्भिणी
अंडा कुंदसमान स्वर्धुनितटीं टाकीयलें ज्या तिनें
तें हें दीसत थोर मंडळ नभीं शीतांशुचें दृष्टिनें ॥ ३९४

आपल्या दुर्दैवाचा दोष दुसऱ्याकडे काय आहे?—

स्वागता.

चातका वदनचंचुसंपुटीं
वारिबिंदुपतनांत हो त्रुटी
जलतुंब धरणी करि जो तो
दोषपात्र तरि कां घन होतो ? ॥ ३९५

स्त्रीपुरुषांची एकांतांतील क्रीडा—

शार्दूलविक्रीडित.

ओढीतां पदरा प्रिया सरभसें झांकी भुजांनीं स्तनां
फेडीतां जघनांशुका मग करी संसक्त ती ऊरुंना
नाभीमूलनिबद्धदृष्टि बघुनी क्रीडानतांगी जवीं
फुंकी दीप तदीय कांपित शिखा कर्णोत्पलें मालवी ॥ ३९६

**माता दधिमंथन करतांना थकलीसें पाहून श्रीकृष्ण दधिमंथन करूं लागले तेव्हां काय चमत्कार झाला ?--**

शार्दूलविक्रीडित.

माते गोरसमंथनें थकलिसी दोरीस मी ओढितों
बोलोनी धरि दामनी बघुनि तें हो वासुकी दीन तो
लक्ष्मी मत्सरयुक्त हो, सुरगणां आनंद होई अती
राहू भीउनि पाहि; रम्य गमली ती गोपबालाकृती ॥ ३९७

**सुंदर स्त्रीचें उदरवर्णन—**

दिंडी.

उदर सुंदर शोभतें तिचें जैसें
पर्णपिप्पल तें असें जणूं भासे
कुचगिरींच्या शिखरास चढायातें
दिव्य त्रिवलीसोपान दिसे तेथें ॥ ३९८

**उद्योगावांचून कार्यसिद्धि होत नाहीं—**

उपजाति.

उद्योग सिद्धीसचि वासने ने
न सिद्धि ती केवळ वासनेनें
भुका निजे जो हरि काननांत
जाती न त्याच्या मृग आननांत ॥ ३९९

**दैवावर न विसंबतां उद्योग करावा---**

वसंततिलका.

उद्योगि जो नर तयासिच प्राप्त अर्थ
दैवासि मुख्य वदती जन तेचि व्यर्थ
दैवासि सोडुनि प्रयत्न बळें करावा
यत्नें न सिद्धि तरि दोष कसा गणावा ? ॥ ४००

मनुष्या, तुला फुकटचा पंडितपणा पाहिजे असेल, तर तूं—

शार्दूलविक्रीडित.

काव्या निंद परांनिं निर्मित अशा, स्पर्धा बुधांशीं करी
उच्चें जल्प, वदे निमीलनयनें श्लोकांस गर्वें तरी
व्यासादी कविपुंगवां कटु वचें बोलोनि धिःकारिजे
विद्वत्ता नसतांच पंडितपणा तूंतें जरी पाहिजे ॥ ४०१

राजदातृत्ववर्णन—

शार्दूलविक्रीडित.

राजा त्वत्करनीरद प्रतिदिशीं पूर्णोन्नती पावतां
चंचत्कांचनरत्नराजिचपलीं स्वर्णामृता वर्षतां
तृप्ता भू गुणिधामरूप, फुगली त्वत्कीर्तिमंदाकिनी
सन्नद्धार्थिसरे, सुशांत विदुषीं दारिद्र्यदावाग्नि ॥ ४०२

जगाशीं वागण्याची आर्यधर्मनीति—

मालिनी.

ज्याच्याशीं जो वर्ततो त्याशि तैसें
वर्तावें हा धर्म आर्यांत बैसे
मायावीशीं वागणें मायिकेनें
साधूसंगें साधुच्या प्रत्ययानें ॥ ४०३

परलोकगताचा सांगाती कोण ?—

गीति.

दारा रता सुतीं त्या, सुत ते तातधनपरिग्रहीं व्यग्र
जननी रोदनशरणा, परलोकगतास कोण हो अग्र ? ॥ ४०४

तीन प्रकारचें क्षणिक वैराग्य—

अनुष्टुभ्.

धर्माख्यानीं श्मशानीं जी । रुग्णावस्थीं मती बने
राहे ती सर्वदा तैशी । कोण राहील बन्धनें ? ॥ ४०५

REFBK-0002364

## राष्ट्रसेवकांचा खरा आर्यधर्म—

भुजंगप्रयात.

अहिंसा असे हा जगीं जैनधर्म
तयानें बुडे राष्ट्रसेवा स्वकर्म
प्रसंगीं करा हिंस्राहिंसा असें तो
वंदे, आर्यधर्मस्थ त्यां मार्ग होतो ॥ ४०६

## अहिंसेनें काय झालें ?—

भुजंगप्रयात.

अहिंसें जगीं मानवी राष्ट्र गेलें
पशूंचें स्थळीं त्याच वर्चस्व झालें
असें विघ्न तें आर्यधर्मी अघोर
बुडाले तयें आर्यधर्मस्थ वीर ॥ ४०७

## सायंकाल—

शार्दूलविक्रीडित.

मित्रास्ता बघुनी सरोजमुख तें दीनाकृती जाहलें
हंसालिंगन हंसिचें रडविण्या भृंगासही लागलें
होतां चक्र वियोगि नाल न धरी तोंडीं त्यजीना तथा
कंठीं केवळ अर्गळेसम धरी जीवासि रोधावया ॥ ४०८

## स्त्रीसौंदर्याची उत्पातपरंपरा—

शिखरिणी.

अनाकाशीं चंद्र द्विदल जलजाचें तदुपरी
धरीलें पश्चार्धा कुटिलकुटिलें त्या तमकरीं
सुधावर्षा उज्जीवन करि न संमोह करिते
विधाता कां निर्मी वद जगांतें उत्पाततितें ? ॥ ४०९

**कोणाला किती जिभा असतात ?--**

शार्दूलविक्रीडित.

जिव्हा पुण्यजनास एक, उरगा दो, चार लोकेश्वरा
सेनानीस सहा, श्रुतींत असती हो सात वैश्वानरा
दाहा राक्षसराज रावण तया, शेषा सहस्रद्वय
दुष्टाला किती त्या नसेचि गणती त्यांचा न संख्यान्वय ॥ ४१०

**विपत्तींतही सज्जन परोपकार करतात—**

शिखरिणी.

विपत्सिंधूमध्यें बुडत असतां धैर्य धरुनी
करी रक्षा लोकीं उपकृतिततती साधु करुनी
जरी चंद्रा राहु ग्रसित करुनी रात्रिं छळितो
तरी दे लोकांना सुखचि उरल्या शीतकरिं तो ॥ ४११

**दुर्जनस्वभाव कधींच पालटत नाहीं—**

पृथ्वी.

जरि प्रबळ भक्तिनें खळ परोपरीं सेविला
न तो तरि कदापिहि प्रसवि शील सद्धेतुला
सशर्करमधुघृतीं बुडवुनी जरी भाजिलें
न गोडपण ये तरी कडुच लागतें कारलें ४१२

**विशाल स्त्रीभालावर उत्प्रेक्षा—**

मंदाक्रांता.

पातिव्रत्य-क्षितिपतिकलत्रादि जे धर्म त्यांचें
पूर्णत्वानें लिखित करण्या पाहिजे पत्र साचें
एतदर्थीं विधि रचितसे भाल शान्तास्त्रियांचें
ऐसें वाटे, नच नवल तें प्रकृतीच्या कृतीचें ४१३

### दुसऱ्याचा ऱ्हास इच्छिणारा स्वतःच नाश पावतो—

शालिनी.

बुध, कवि, गुरु यांतें आत्मतेजें गभस्ती
मधुनि मधुनि नेई गर्वभारांत अस्तीं
म्हणुनिच रवि नेमें रोज अस्तासि जातो
जपत मनिं परास्ता साच तो नष्ट होतो ॥ ४१४

### सुंदर स्त्रियेची कटि बारीक आणि नितंब पुष्ट कां असतात ?—

पृथ्वी.

सुरम्य रमणीप्रती विधि जधीं रचूं लागला
तयें भरियलें न ज्या उकरिलें अशा त्या स्थला
म्हणोनि कटि जाहली सहज मुष्टिग्राह्या, तसे
नितंब घन राहिले, गमत सूरिला हें असें ॥ ४१५

### एकावली अलंकार—

शार्दूलविक्रीडित.

विद्या भूषण हें नरास तिजला भूषाच शांती असे
शांतीतें सुपराक्रम प्रगतिचा शोभा झणी देतसे
तैशा त्या सुपराक्रमास सरला सिद्धी शुभा ती खरी
सिद्धी तीच दहा दिशांत भरवी सत्कीर्ति ही वैखरी ॥ ४१६

### रागावला तर हंसाचें काय करील ?—

वसन्ततिलका.

राजीवकाननविहारविलासि ऐसा
कोपें जरी विधि हकील तिथूनि तैसा
त्याची न दुग्धजलभेदनधर्मकीर्ती
नासूं शकेल किमपी कमलस्थ-मूर्ती ॥ ४१७

## स्त्रीमुख व चंद्र यांचें व्यतिरेकवर्णन—

शिखरिणी.

जयाच्या आलोकें विरहिजनसंताप हरतो
यदंकीं सानंदें नयनकुमुदा खेळ मिळतो
न हो यच्छ्री ऊना कचनिचयराहु ग्रह तरी
हरो मत्खेदा तो वदनहिमधामा झडकरी ॥ ४१८

## वृद्धा स्त्री आणि जलधरागमश्री यांचें साम्यवर्णन—

पृथ्वी.

प्रलंबित पयोधरा, क्षतरजोविकारांगिची
सदा विगतहंसका तिमिरलुप्ततारारुची
तिरस्कृतनिशाकरा गतवया सुवृद्धा अशी
दिसे सपदि लोचनीं जलधरागमश्री जशी ॥ ४१९

## श्रीकृष्णस्तवन—

पृथ्वी.

निशाकर जसा रमे गगनतारकारंगणीं
स्वराशिसह शीतशा मधुर दिव्य त्या प्राङ्गणीं
सुभामिनिऽधरामृतीं रत गमे तसा जो हरि
प्रसन्न सकलां असो ! अवन तो जगाचें करी ॥ ४२०

## नरनारायणरूपी शक्त्युक्तींना सुमनार्पण—

शार्दूलविक्रीडित.

श्रीकृष्णार्जुन युक्तिशक्ति अशि ती जोडी मला आशि- ४१२
देवोनी सुखबोच द्वैत हरवो इष्टार्थकार्यांत तें
शक्त्युक्तिद्वयसंघ जेथ मिरवे तेथेंच श्री रंगते
मोदानें विजयी, कवित्वसुमनें अर्पी तशा देवते ॥ ४२१

समाप्त.